बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे



गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक २९ | बुधवार, दि.२६ जून २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

# बाबा जुमदेव यांच्या जयंतीनिमित्त ३ एप्रिलला सार्वजनिक सुट्टी देणार-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**■ भंडारा जिल्ह्यातील ५४७ कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भुमिपूजन**

**■ जल पर्यटनच्या वाढीव विकास आराखड्यास मंजुरी देणार-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

**भंडारा :-** आमचे सरकार हे सर्व सामान्यांचे व शेतकऱ्यांचे सरकार असून शेतकऱ्यांना प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत केंद्र सरकारकडून सहा हजार व राज्य सरकारकडून सहा असे बारा हजार रुपये, सानुग्रह अनुदान व धानाला सातशे रुपये बोनस देणार हे पहिलं सरकार आहे. आता ५४७ कोटी रुपये खर्च करून भंडारा जिल्ह्याचा सर्वांगीण विकास होणार आहे. १०२ कोटी रुपये खर्च करुन जलपर्यटन सुरु होत आहे. यामुळे जिल्ह्यातील पर्यटनाला चालना मिळणार असून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल, अशी ग्वाही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.



भंडारा जिल्ह्यातील वैनगंगा नदीवरील जल पर्यटनासोबतच ५४७ कोटी रुपयांच्या विकास कामांचे भूमिपूजन आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. वैनगंगा जलाशयातील जल पर्यटनाच्या वाढीव आराखड्यास मान्यता देण्याचे व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले बाबा जुमदेव यांच्या जयंतीनिमित्त (तीन एप्रिल ) सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले.

यावेळी आमदार नरेंद्र भोंडेकर, पोलीस महानिरीक्षक छेरिंग दोरजे, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी समीर कुर्तकोटी व जिल्हा पोलीस अधीक्षक लोहित मतानी यांची कार्यक्रमास उपस्थिती होती.

जलपर्यटन केंद्राचा प्रथम टप्पा, भूमिगत गटार योजना, अमृत योजने अंतर्गत भंडारा आणि पवनी येथील तलाव सौंदर्यीकरण, नगरोत्थान अभियाना अंतर्गत रस्ते बांधकाम, भंडारा व पवनी नगर परिषद अंतर्गत वैशिष्ट्पुर्ण योजनांची कामे, जिल्हा नियोजन समिती अंतर्गत भंडारा व पवनी नगर परिषदमध्ये विविध विकासकामे, जिल्हा क्रिडा संकुल भंडारा येथे विविध सुविधा, सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत विविध कामे या विकास कामांचा भूमिपूजन सोहळा मुख्यमंत्री यांच्या हस्ते संपन्न झाला.

होत असलेल्या विकास कामांमुळे भंडारा जिल्ह्याला पर्यटकांची पहिली पसंती मिळणार आहे. जल पर्यटनाच्या साध्याच्या १०२ कोटीचा आरखडा २०० कोटीचा करावा अशी मागणी आमदार भोंडेकर यांनी आपल्या भाषणात केली होती. यावर वाढीव विकास आराखड्याला मंजुरी देण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. त्याचप्रमाणे भंडारा जिल्ह्याच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

५४७ कोटी रुपये खर्च करून होणाऱ्या विकास कामामुळे भंडारा बनणार पर्यटन विकासासोबतच रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे. मुख्यमंत्री पाठीशी असल्यामुळे आजची विकास कामे मार्गी लागली आहेत असे आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी सांगितले. १०२ कोटी रुपये खर्च करून गोसेखुर्द जलाशयात जल पर्यटन सुरू करण्यात आले आहे. या कामाचा विकास आराखडा वाढवून २०० कोटी रुपये करण्याची मागणी त्यांनी केली. ३ एप्रिल रोजी शासकीय सुट्टी जाहीर करण्याची मागणीही त्यांनी केली. महिला बचत गटांसाठी भंडारा येथे २०० गाळ्यांचे व्यापार संकुल उभारण्यासाठी पुढाकार घ्यावा असे त्यांनी सांगितले.

### जलपर्यटन प्रकल्पाची वैशीष्ट्य

**भंडारा येथील मौंदी येथे असलेला हा जल प्रकल्प जागतिक दर्जाचा आहे. भंडारा जिल्ह्यातील जलपर्यटन प्रकल्पात नाविन्यपुर्ण जल पर्यटन केंद्र, पर्यटकांसाठी भव्य आसन व्यवस्था विविध प्रकारच्या खादय प्रकारांचे उच्च दर्जाचे उपहारगृह, पर्यटकांना पोहण्याचा आनंद लुटण्यासाठी नाविन्यपूर्ण कृत्रिम तलाव, पर्यटकांसाठी विविध सुविधा, जलतरण तलाव, माहिती केंद्र, कॉन्फ्ररन्स हॉल, व्यवस्थापक आणि कर्मचारी निवास तरंगती जेट्टी वाहनतळ याचा समावेश असेल.**

आजच्या भुमिपूजनातील विशेष उल्लेख करण्याजोगा प्रकल्प म्हणजे जलपर्यटन प्रकल्प आहे. या प्रकल्पामुळे स्थानिक रोजगार निर्मीती होईलच पण भंडारा जिल्हा भारताच्या नकाशावर अग्रगण्य पर्यटन स्थळ म्हणून उदयास येईल असा विश्वास जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी व्यक्त केला. आज भूमिपूजन झालेल्या सर्व कामांचा एकत्रीत परिपाक म्हणजे जिल्ह्यातील नागरी पायाभूत सोयी सुविधा आणि क्रिडा विषयक सोयी सुविधा यांची दर्जोन्नती होण्यामध्ये निश्चितच मदत होणार आहे असे ते म्हणाले.

राज्य शासनाच्या विविध उपक्रमांच्या अंमलबजावणी मध्ये भंडारा जिल्हा हिरीरीने सहभाग घेतो. माझी शाळा, सुंदर शाळा या स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील १२०० शाळांनी उस्फुर्त सहभाग घेतला. जिल्हा नियोजन समितीच्या मार्फत पुढील ५ वर्षांसाठी सर्वसमावेशक District strategic lan म्हणजेच जिल्हा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. त्याचबरोबर शासन आपल्या दारी, दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी, महानाट्य महोत्सवाचे माध्यमातून जाणता राजा हे भव्य शिवचरित्र आणि महासंस्कृती महोत्सवातून जिल्ह्यातील आणि राज्यातील विविध कलाप्रकार नागरिकांपर्यंत पोहोचविणे या सर्वांचे यशस्वी आयोजन जिल्ह्यामध्ये करण्यात आलेले आहे असेही त्यांनी सांगितले. उपस्थितांचे आभार मुख्याधिकारी करणकुमार चव्हाण यांनी मानले.

# काकाजीच्या निर्देशानेच जिल्हा काँग्रेसला डावलून नवनिर्वाचित खासदार पडोळेंचा दौरा?

**गोंदिया:** लोकसभा निवडणुकीत राब राबणाऱ्या काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्ता,पदाधिकाऱ्यांना डावलून नवनिर्वाचित खासदारने भाजपप्रमीत जि.प.च्या सभापती व नेत्यासोबत वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेतल्याचे छायाचित्र समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्याने नाना पटोलेंचा खरा कानमंत्र खासदार पडोळेंनी पाळायला सुरवात केल्याची चर्चाही सुरु झाली आहे.कुठल्याही प्रश्नाच्या उत्तरात काकाजी(नाना पटोले)च्या निर्देशानुसारच आपण काम करणार असे बोलणारे नवनिर्विचात खासदार प्रशांत पडोळेचा हा दौरा जिल्ह्यातील काँग्रेससह महाविकास आघाडीच्या नेत्याकरीता विधानसभा निवडणुकीपुर्वीच झटका देणारा ठरला आहे.पडोळेंच्या या कृतीला काकाजीचेंच समर्थन असल्याने ते काँग्रेसपदाधिकारी ऐवजी गोंदिया शहरातील काकाजी प्रेमी व्यापारी वर्गाला भेटायला गेले,हे सत्य नाकारता येत नाही.



भंडारा-गोंदिया लोकसभेचे काँग्रेसचे खासदार डॉ. प्रशांत पडोळे निवडणुक जिंकल्यानंतर पहिल्यांदा शनिवार २२ जून रोजी गोंदियात आले. त्यांच्या या छुप्या दौऱ्याची माहिती जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अनेक पदाधिकाऱ्यांना नव्हती. त्यामुळे जिल्हा काँग्रेस कमिटीत कुजबूज सुरू आहे. यामुळे अनेक पदाधिकारी दुखावल्याचे बोलले जाते. एखादा उमेदवार खासदार, आमदार, मंत्री झाल्यानंतर त्यांच्या प्रथम नगरागमनानिमित्त पदाधिकारी, कार्यकर्ते जल्लोषात स्वागत करतात, फटाक्यांची आतिषबाजी केली जाते. मात्र नवनिर्वाचित खासदार प्रशांत पडोळे यांचे बाबतित काही वेगळेच झाले. शनिवारी ते गोंदिया येथे आले असता त्यांच्या आगमनाची साधी कल्पना पदाधिकाऱ्यांना नव्हती.

खासदार आले आणि त्यांनी जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता यांची भेट घेतली. दरम्यान त्यांनी शहरातील काही बड्या व्यापारींचीही भेट घेतल्याचे कळते. त्यांच्या दौऱ्याबद्दल जिल्ह्यातील काँग्रेस प्रदेश सचिव, जिल्हाध्यक्ष, शहराध्यक्ष, तालुकाध्यक्षांसह काँग्रेसच्या अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते अनभिज्ञ असल्याची चर्चा कार्यकर्ते व सामाजिक माध्यमांवर होती. खा. पडोळेंच्या शनिवारच्या दौऱ्याबद्दल जाणून घेण्यासाठी त्यांच्या भ्रमणध्वनीवर वारंवार संपर्क केला असता होऊ सकला नाही.

दरम्यान काँग्रेस जिल्हाध्यक्ष दिलीप बन्सोड यांना विचारले असता त्यांनी पडोळेंच्या दौऱ्याला दुजोरा दिला. खा. पडोळे यांनी जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, अधिष्ठाता यांची भेट घेऊन चर्चा केल्याची माहिती आपल्याला इतर माध्यमातून मिळाली. मात्र जिल्हा काँग्रेस कमिटीलाही दौऱ्याची माहिती नसल्याचे त्यांनी सांगीतले.

# गोंदिया जिल्ह्यात घटली सारस पक्ष्यांची संख्या,यावर्षी २५ पक्ष्यांची नोंद

**गोंदिया :** जिल्ह्यात दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील २३ जून २०२४ रोजी गोंदिया वनविभाग व जिल्ह्यातील विविध अशासकीय संस्था यांचे संयुक्त विद्यमाने सारस पक्षी प्रगणनेचे आयोजन करण्यात आले होते. २०२३ च्या तुलनेत यावर्षी ६ ने सारस पक्ष्यांची संख्या कमी झाली आहे.



गेल्या दोन तीन वर्षाचा विचार केल्यास दरवर्षी सारस पक्ष्यांची संख्या कमी होत चालली आहे. एकीकडे सारस संवर्धनाच्या नावावर जिल्हा प्रशासन कोट्यवधी रुपयाचे नियोजन करीत असताना सारस पक्ष्यांची संख्या कमी होत चालली आहे.न्यायालयानेही सारस पक्षी संवर्धनाकरीता जिल्हा प्रशासनाला ताकीद देऊनही जिल्हा प्रशासन अपयशी ठरले आहे.

गोंदिया जिल्ह्यातील सारस पक्ष्यांचे अधिवास असलेल्या गोंदिया, तिरोडा व आमगाव तालुक्यांतर्गत एकूण ७० वेगवेगळ्या ठिकाणी जिल्ह्यातील अशासकीय स्वयंसेवी संस्थेचे स्वयंसेवक, सारस मित्र, शेतकरी व गोंदिया वनविभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही गणना सकाळी ५ ते ९ वाजेपर्यंत केलेली असून सारस पक्षी प्रगणनेमध्ये एकूण २५ सारस पक्ष्यांची नोंद झालेली आहे. काही स्थळांवर अपेक्षित असणारे सारस पक्ष्यांची जोडपी निदर्शनास न आल्याने सदर ठराविक स्थळांवर पुन्हा चमू ३ ते ४ दिवस भेट देवून गणना करणार आहे. सदर गणना पुर्ण झाल्यानंतरच नेमकी सारस पक्ष्यांची संख्या कळेल.

सारस पक्ष्यांची प्रगणना करण्यासाठी एकूण ३९ चमू तयार करण्यात आले होते. प्रत्येक चमूमध्ये स्वयंसेवी संस्थेचे स्वयंसेवक, सारस मित्र, स्थानिक प्रतिनिधी/शेतकरी, वन विभागातील वनपाल, वनरक्षक असे एकूण ५ ते ६ व्यक्ती सहभागी होते.

सारस पक्षी प्रगणनेकरीता जिल्ह्यातील सेवा संस्था व इतर अशासकीय संस्थेचे स्वयंसेवक, सारस मित्र, शेतकरी तसेच गोंदिया वनविभागातील कमचाऱ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवून सारस पक्ष्यांचे अधिवास असलेले पाणथळ जागा, नद्या, शेतांमध्ये, तलावांजवळ जाऊन पाहणी करुन सारस पक्ष्यांची प्रगणना केली.

# ७ लाखाचे बक्षी असलेल्या नक्षलवाद्याचे आत्मसमर्पण ११ वर्षापासून नक्षल चळवळीत होता सक्रीय

**गोंदिया :** जहाल माओवादी पहाडसिंग याचा अंगरक्षक म्हणून काम करणारा तसेच दर्रेकसा एरिया कमिटी, प्लॉटून -१, व (सी.एन. एम.) चेतना नाट्य मंच मध्ये काम करणारा आणि गोंदिया जिल्ह्यातील पोलिस नक्षल चकमकीत काम करणाऱ्या जहाल नक्षलवादी संजय उर्फ बीच्छेम सुकलू पूनेम (२५) रा.पुसनार, ता. गंगालूर, जि. बिजापूर ( छत्तीसगड) असे आत्मसमर्पण करणाऱ्या नक्षलवाद्याचे नाव आहे. त्याच्यावर ७ लाखाचे बक्षीस होते.

देशातील माओवादी चळवळीला प्रतिबंध व्हावा व अधिकाधिक माओवाद्यांनी आत्मसमर्पण करून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरीता तसेच त्यांचे सामाजिक व आर्थीक पुनर्वसन व्हावे या उद्देशाने महाराष्ट्र शासनामार्फत नक्षल आत्मसमर्पण योजना राबवित आहे. या आत्मसमर्पीत नक्षलवादी बीच्छेम याने जिल्हाधिकारी प्रजित नायर, पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक नित्यानंद झा यांच्यासमक्ष नक्षलवाद्यांच्या त्रासाला कंटाळून ३ जून रोजी आत्मसमर्पण केले आहे. संजय उर्फ बीच्छेम सुकलू पूनेम याने सन २०१७-२०१८ मध्ये प्लॉटून-१ मध्ये कार्यरत असताना गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा पोलीस ठाण्यांतर्गत मुरकुटडोह, टेकाटोला, तसेच चिचगड पोलीस ठाण्यांतर्गत कोसबी जंगल परिसरात घडलेल्या नक्षल- पोलीस चकमकीत सक्रीय सहभाग होता.

### माओवाद्यांच्या भूलथापाला बळी पडू नका

**माओवादी चळवळीचे समूळ उच्चाटन करण्याकरीता गोदिया जिल्हयात प्रभावी नक्षल विरोधी अभियान राबविण्यात येत आहे. विविध उपक्रम राबवून शासनाच्या कल्याणकारी योजनांची जनतेला, नागरिकांना माहिती देवून जनजागृती करण्यात येत आहे. जे माओवादी विविध भूलथापा आणि प्रलोभनांना बळी पडून माओवादी संघटनेत भरती झाले आहेत. त्यांना हिंसेचा मार्ग सोडून समाजाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट होण्याबाबत आवाहन करण्यात आले आहे.**



### आत्मसमर्पीत होण्याची सांगितली कारणे

**◆नक्षल संघटनेचे/चळवळीचे नेमके ध्येयधोरण खालील कॅडर ला कळत नाही. भविष्य अंधकारमय वाटतो. माओवादी संघटनेतील वरिष्ठ कॅडर हे नक्षल चळवळी करीता पैसे/फंड गोळा करण्याबाबत सांगतात. परंतु प्रत्यक्षात सदर पैसा हे स्वतःसाठीच वापरतात.**

**◆शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांमुळे जनतेचा माओवाद्यांना पाहिजे तसा पाठींबा मिळत नाही. माओवादी नेते हे फक्त स्वतःच्या फायद्यासाठी गरीब आदिवासी युवक-युवतींचा वापर करुन घेतात.**

**◆दलममध्ये असतांना विवाह झाले तरी वैवाहिक आयुष्य जगता येत नाही. परीवारातील सदस्यांना, नातेवाईकांना कोणतीही अडचण असली तरीही मदत करता येत नाही. दलममध्ये असतांना वेळेवर जेवण मिळत नाही. तेथील जिवन फ्क्रार खडतर असते. आरोग्या विषयीं समस्या, उद्भवल्यास त्याकडे काळजीपूर्वक लक्ष दिले जात नाही.**

**◆पोलीस दलाच्या सततच्या नक्षल विरोधी अभियानामुळे जंगलातील वावर धोकादायक झाले आहे. पोलिसांची सारखी भीती वाटते. वरिष्ठ कॅडर हे पोलीस खबरी असल्याच्या संशयावरुन निरपराध आदिवासी बांधव/ सामान्य नागरीकांना ठार मारायला सांगतात. महाराष्ट्र शासनाच्या आत्मसमर्पण योजनेने प्रभावित होऊन समर्पण करण्याचा निर्णय घेतला असे बीच्छेम चे म्हणणे असल्याचे पोलिसांनी सांगितले.**

# जलजीवनची तब्बल ६४६ कामे अपूर्ण

**गोंदिया:** नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे यासाठी जिल्ह्यात जल जीवन मिशन अंतर्गत

### स्थायी समितीच्या सभेत गाजला मुद्दा

**जिल्हा परिषदेची स्थायी समितीची सभा मंगळवारी पार पडली. या सभेत जल जीवन योजनेच्या अपूर्ण कामाचा मुद्दा जि.प. सदस्य लायकराम भेंडारकर व इतर सदस्यांनी लावून धरला. यावर अध्यक्षांनी जि.प.च्या सर्व साधारण सभेत ठराव कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात येईल असे सांगितले.**

१०४६ कामांना मंजूरी देण्यात आली. पण कंत्राटदारांनी दिलेल्या वेळेत कामे पूर्ण न केल्याने ६४६ कामे अपूर्ण असल्याची बाब पुढे आली आहे. कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी जि.प. ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने संबंधित कंत्राटदारांना नोटीस बजावून दंडही ठोठावला पण याचा कसलाही परिणाम झाला नसल्याचे चित्र आहे.

जल जीवन मिशन योजनेंतर्गत हर घर नल, नल से जल ही योजना राबविली जात आहे. ही योजना प्रभावीपणे राबविली जावी, या योजनेच्या कामात निधीचा अडसर येऊ नये यासाठी शासनाने या योजनेसाठी लागणारा निधी सुद्धा आधीच उपलब्ध करुन दिला. गोंदिया जिल्ह्यात १०४६ कामांना मंजूरी देण्यात आली होती. तसेच ही कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी कंत्राटदारांना मुदत देण्यात आली होती. पण यानंतरही जिल्ह्यातील ६४६ कामे अपूर्ण आहेत. ही कामे उन्हाळ्यापुर्वी पूर्ण न झाल्याने अनेक गावातील नागरिकांना पाणीटंचाईच्या समस्येला तोंड द्यावे लागले. तर अनेक ठिकाणी सुरु असलेल्या कामात कंत्राटदाराचा नममर्जी कारभार कायम असून स्थानिक ग्रामपंचायतींना सुद्धा विश्वासात घेतले जात नसल्याचा आरोप आहे.

तर जि.प. ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने संबंधित कंत्राटदारांना वेळेत कामे पूर्ण करण्यासाठी नोटीस बजावून दंड देखील ठोठावला. पण यानंतरही कंत्राटदाराच्या भूमिकेत कसलाच बदल झाला नसल्याचे चित्र आहे.

# गडचिरोलीतील माओवादी चळवळीची कंबर मोडली-देवेंद्र फडणवीस

## उपमुख्यमंत्री फडणवीसच्या उपस्थितीत जहाल मोहक्या नक्षली गिरीधरचे सपत्नीक आत्मसर्पण

**गडचिरोली:** गडचिरोलीतील जहाल माओवादी आणि जिल्ह्यातील नक्षली चळवळीचा मोहक्या समजल्या जाणाऱ्या गिरधरने आज पत्नीसह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आत्मसमर्पण केले. पोलिसांच्या या यशामुळे गडचिरोलीतील माओवादी चळवळीची कंबर मोडली असल्याचे श्री फडणवीस यांनी सांगितले. श्री देवेंद्र फ्फडणवीस यांनी या दाम्पत्याला संविधानाची प्रत भेट दिली. एका छोटेखानी कार्यक्रमात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या नक्षली दाम्पत्याला २५ लाख रुपयांची मदत पुनर्वसनासाठी करण्यात आली.

आत्मसमर्पित माओवाद्यांचा मेळावा व माओवाद्यांच्या कुटुंबियांशी संवाद कार्यक्रमाचे आयोजन पोलिस मुख्यालयातील एकलव्य हॉल येथे करण्यात आले होते. आमदार देवराव होळी, आ. कृष्णा गजबे, जिल्हाधिकारी संजय दैने, नक्षल विरोधी अभियानाचे महानिरीक्षक अंकित गोयल, जिल्हा पोलिस अधीक्षक श्री निलोत्पल यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

नांगसू मनकू तुमरेटी ऊर्फ गिरीधर याचेवर २५ लाखांचे बक्षीस होते, तर त्याच्या पत्नीवर १६ लाखांचे बक्षीस होते. गडचिरोली जिल्ह्यातील वरिष्ठ नक्षली कमांड असलेल्या या दोन्ही नक्षल्यांनी आत्मसमर्पण केल्याने जिल्ह्यातील नक्षलवादी कारवायांना मोठा हादरा बसला आहे. माओवादी गतिविधीचे प्रमुख म्हणून या दोघांकडे पाहिले जायचे. यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, गेल्या ४ वर्षांत जिल्ह्यातील एकही व्यक्ती नक्षली कारवायात सहभागी झाला नाही, हे यश आमच्या पोलिस दलाने मिळविले आहे. सी-६० पथकाने आपला दरारा असा निर्माण केला की, एकतर त्यांना शरणागती पत्करावी लागेल किंवा बंदुकीचा सामना करावा लागेल. ते या पथकाचे मोठे यश आहे. गडचिरोली पोलिसांनी नक्षलवादाचे कंबरडे मोडले आणि दुसरीकडे सरकारच्या विविध योजना तळागाळापर्यंत पोहोचवल्या. अंतिम माणसाच्या विकासाचाच हा प्रयत्न आहे. शेवटच्या माणसापर्यंत विकास पोहोचू नये, हाच प्रयत्न नक्षलवाद्यांनी केला. पण, आज तो विकास पोहोचतो आहे, हे मला अनेक दुर्गम भागात जाऊन पाहता आले आहे. गडचिरोली हा आमच्यासाठी महाराष्ट्राचा शेवटचा नाही, तर पहिला जिल्हा आहे. म्हणून या जिल्ह्याचा विकास आमच्यासाठी महत्त्वाचा आहे. उद्योग, रोजगार, कौशल्य प्रशिक्षण, शिक्षण यासाठी मोठा प्रयत्न हाती घेण्यात आला आहे. मोठी गुंतवणूक या जिल्ह्यात येत आहे. कालही काही प्रकल्पांबाबत मी बैठक घेतली, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वात आदिम जमातींसाठी २४,००० कोटींची योजना, आदिवासी संस्कृतीचे जतन, देशातील प्रथम आदिवासी महिला राष्ट्रपती अशा अनेक घटना या आदिवासींना बळ देणाऱ्या आहेत. शिस्त आणि संवेदना एकत्र झाल्यानेच गडचिरोली पोलिसांबद्दल आदराची भावना आहे, असेही गौरवोद्गार देवेंद्र फडणवीस यांनी काढले.



पोलिस भरतीला स्थगिती दिली तर १७,००० पदांची भरती विधानसभांची आचारसंहिता लागणार असल्याने पुढच्या वर्षावर जाईल. त्यानंतर आणखी ९००० पोलिस भरती करायची असल्याने आणखी एक वर्ष लांबणीवर जाईल. त्यामुळे जेथे पाऊस आहे, तेथे दुसरी तारीख देऊन पदभरती पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. आज गडचिरोलीत तर आपण केवळ स्थानिकांचीच भरती करतो आहोत. १००० पदांसाठी गडचिरोलीतील २८,००० युवकांनी अर्ज भरले आहेत. त्यांचे वयाचे नुकसान होऊ नये, असे सांगून वेळेतच पोलिस भरती करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, असेही फडणवीस म्हणाले. एकीकडे नक्षली दलात एकही व्यक्ती भरती होत नाही व पोलिस दलात भरतीसाठी २८ हजार अर्ज यातून नागरिकांचा संविधानाप्रती व्यक्त विश्वास दिसून येत असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रसार माध्यमांनी देखील गडचिरोलीची प्रतिमा उंचावण्यात महत्वाचे योगदान दिल्याबद्दल त्यांनी माध्यमांना धन्यवाद दिले. नक्षल विरोधी अभियानाचे महानिरीक्षक अंकित गोयल यांनी केंद्र व राज्य शासनाकडून नक्षलविरोधासाठी कायम सहकार्य व मदत मिळत असल्याचे सांगितले तर जिल्हा पोलिस अधिक्षक निलोत्पल यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविकातून नक्षलविरोधी कार्याची माहिती दिली.

## संपादकीय

### आरक्षण देताना सामाजिक समतोल राखणे महत्त्वाचे

बिहार राज्यातील पाटणा उच्च न्यायालयाने आरक्षणप्रकरणी निर्णय देताना वाढीव १५ टक्के आरक्षणावर आक्षेप घेत हे आरक्षण रद्द केले आहे. बिहारमधील नितीश कुमार सरकारने राज्यातील समीकरणे आपल्या पक्षीय राजकारणाला अनुकूल व्हावीत यासाठी आरक्षणाची मर्यादा ६५ टक्क्यांवर नेली होती. यावर हरकत घेत काहींनी न्यायालयात धाव घेतली असता न्यायालयाने हे वाढीव १५ टक्के आरक्षण रद्द करण्याचा निर्णय घेतल्याने बिहारच्या नितीश कुमार सरकारला एक प्रकारे दणकाच दिला आहे. आरक्षणाबाबत घटनेमध्ये विशिष्ट तरतूद असताना कोणीही राजकीय घटना सभागृहात असलेल्या संख्याबळाच्या पाठबळावर आरक्षणाबाबत मनमानी निर्णय घेऊ शकत नसल्याचे स्पष्ट संकेत व निर्देश पाटणा उच्च न्यायालयाने आपल्या निकालातून दिले आहेत. या निकालाचे दूरगामी परिणाम विविध राज्यांतील आरक्षण प्रक्रियेवर होणार आहेत. विशेषत: अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रावर आजच्या घडीला अधिक दूरगामी परिणाम उमटणार आहेत.

देशातील काही राज्यांमध्ये सध्या आरक्षण प्रकरणाने राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. अन्य राज्यांमध्ये हा विषय फारसा ज्वलंत नसला तरी महाराष्ट्रातील राजकीय व सामाजिक वातावरण तसेच स्वास्थ्य आरक्षण या विषयाने ढवळून निघाले आहे. या आरक्षणावरूनच सध्या मराठा व ओबीसी यांच्यात कलगीतुरा सुरू आहे. आरोप–प्रत्यारोप, मोर्चे, आंदोलने, उपोषणे, निदर्शने आदी लोकशाहीतील सर्व आयुधे वापरण्याचा प्रकार आरक्षणाच्या पुरस्कर्त्यांकडून सुरू आहे. मराठा समाजाला आजवर आरक्षण न मिळाल्याने महागड्या शिक्षणाचा त्यांना स्वीकार करावा लागत असल्याचे सांगत मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. मराठा समाजाला आरक्षण ओबीसी समाजातून देण्यात यावे असा मराठा आरक्षणासाठी लढा उभारणाऱ्यांचा आग्रह आहे, तर मराठ्यांना स्वतंत्र आरक्षण द्यावे, त्यांना ओबीसीच्या वाट्यात सामावून घेऊ नये यासाठी ओबीसी समाजाचे नेते देखील आक्रमक झाले आहेत. त्यांनीही उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे. त्यामुळे आरक्षणाच्या नावाखाली राजकीय घटक आपली निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न करत असले तरी मराठा व ओबीसी या जातीव्यवस्थेमध्ये काही प्रमाणात तेढ निर्माण होण्याचा प्रयत्न सुरू झालेला आहे. समाज स्वास्थ्यासाठी ही घातक बाब आहे.

मराठा आरक्षणाच्या नावाखाली मराठा मतदार आपल्यापासून दुरावत चालल्याचे निदर्शनास आल्यावर प्रस्थापित राज्यकर्तेही मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी झुकते माप देण्यासाठी प्रयत्न करू लागले होते. त्याला अलीकडेच संपन्न झालेल्या लोकसभा निवडणुकीतील यशापयशाची झालरही तितकीच कारणीभूत होती. लोकसभा निवडणुकीत भाजपाचे रावसाहेब दानवे आणि पंकजा मुंडे व अन्य काही मातब्बर मराठा समाजाच्या नाराजीमुळेच पराभूत झाले आहेत. महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका आता अवघ्या साडेतीन महिन्यांवर येऊन ठेपलेल्या आहेत. विधानसभा निवडणुकीत मराठा समाजाची नाराजी कायम राहिल्यास सत्तासंपादनासाठी आवश्यक असलेला १४५ हा जादुई आकडा गाठणे महायुतीला अवघड जाणार असल्याचे संकेत लोकसभा निवडणूक निकालात प्राप्त झाले होते. त्यामुळेच घटनेत थोडासा बदल करून आरक्षणाची टक्केवारी वाढवून मराठा घटकाला आपलेसे करण्याचा राजकीय घटकांचा प्रयत्न होता. पण आता या प्रयत्नांनाच पाटणा उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे खीळ बसणार आहे.

सध्या महाराष्ट्रात ६२ टक्के आरक्षणाची मर्यादा आधीच असताना त्यात मराठा समाजासाठी आरक्षण देण्याने आरक्षण मर्यादेत आणखीनच वाढ होणार आहे. आरक्षणाचा विषय निघाल्यावर आरक्षणाचे समर्थक अथवा आरक्षणासाठी आग्रही असणारे घटक तामिळनाडू राज्यात असलेल्या ६९ टक्के आरक्षणाकडे बोट दाखवित असतात. तामिळनाडूला एक न्याय आणि आम्हाला वेगळा न्याय का, असा टाहो देखील आरक्षणाच्या समर्थकांकडून फोडण्यात येत आहे. तामिळनाडूच्या ६९% आरक्षणाला अद्यापही सर्वोच्च न्यायालयाची मान्यता नाही. तामिळनाडूच्या या आरक्षणाला आव्हान देणारी मद्रास उच्च न्यायालयाचे वकील ॲड. के. एम. विजयन यांची याचिका गेली अनेक वर्षे सर्वोच्च न्यायालयात स्थगित आहे. या याचिकेवर वेळोवेळी सुनावण्या झाल्या आहेत. मंडल आयोगाच्या आधीच तामिळनाडूत ६० टक्के आरक्षण राबवले जात होते. नंतर मंडल कमिशनच्या शिफारसीबाबत सहानी केसमध्ये सर्वोच्च न्यायालयाने एकूण ५० टक्क्यांपेक्षा आरक्षण देता येणार नाही, असे सांगितले. तरी सुद्धा आज तामिळनाडूत ६९ टक्के आरक्षण दिले जात आहे.

तामिळनाडूमधल्या ६९% आरक्षणाची खऱ्या अर्थाने वेगवान अंमलबजावणी सुरू झाली ती सर्वात लोकप्रिय मुख्यमंत्री एम. जी. रामचंद्रन यांच्या काळात. १९९३ ला जयललिता मुख्यमंत्री असताना त्यांनी ६९% आरक्षणाचा कायदाच केला आणि घटनेच्या ९ व्या शेड्यूलमध्ये टाकून तो मंजूर करून घेतला. एखादा कायदा घटनेच्या नवव्या शेड्यूलमध्ये मंजूर करून घेतला गेला असेल, तर त्यात सर्वोच्च न्यायालय कमीत कमी दहा वर्षे हस्तक्षेप करू शकत नाही, अशी स्थिती होती.

पाटणा उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे आता आरक्षणाबाबत आग्रही भूमिका मांडणाऱ्या सर्वच राज्यांतील घटकांच्या महत्त्वाकांक्षांना आता पायबंद बसेल व काही प्रमाणात आरक्षणाच्या वादळालाही लगाम घालणे शक्य होईल. आरक्षण देताना राज्यकर्त्यांचा राजकीय स्वार्थ असता कामा नये. आरक्षण देताना समाजामधील सामाजिक समतोल राखणे काळाची गरज आहे. आरक्षणामुळे समाजातील गरजू घटकांचा विकास होणे आवश्यक आहे. आर्थिक निकषावरील आरक्षणाला सर्वोच्च न्यायालयानेही मंजुरी दिलेली आहे. प्रत्येक समाजामध्ये आर्थिक क्षेत्रात पिछाडीवर असलेल्या घटकांचा या आरक्षणातून विकास होणे सहजशक्य आहे. आरक्षणातून समाजातील अर्थकारणाचा व प्रगतीचा समतोल राखला जाणे आवश्यक असून समाजात वाद निर्माण होणे कोणालाही अपेक्षित नाही.

# ओबीसीची नाही, तर गणना वाघांची होणार !



बुद्धपौर्णिमेला लख्ख चांदण्यात वाघांची गनणा होणार याची सर्वत्र चर्चा होत होती. व्याघ्रगणनेसोबतच इतर प्राण्यांच्याही संख्येचा लेखाजोखा समोर येतोच. सालाबादाप्रमाणे जंगलातील वाघांची मोजदाद होणार. त्यामुळे गणतीची जोरदार चर्चा रंगली होती. लेकरंबाळं पोरंपोरी बाईबापुड्या आबालवृद्ध गल्लीबोळात रस्तोरस्ती एकच पाढा वाचत होते. वाघांची गणती होणार...

ओबीसीच्या जनगणनेसाठी चालू असलेला लढा, ओबीसी आंदोलनाची आठवण गण्याच्या मनात टवटवीत होती. तिचा घमघमाट गणूला कासावीस करत होता. पण ओबीसी जनगणनेसाठी संबंधित यंत्रणेच्या मुखातून अवाक्षरही निघत नाही. गण्याच्या मनात ही घटना खोलवर मुरली होती. ओबीसीची जनगणना केली जात नाही आणि वाघांची जनगणना कशी काय होऊ शकते? अहोरात्र गण्याच्या मनात एकच रणकंदन चालू होते...व्याघ्र जनगणना! रात्री झोपेतही गण्या व्याकूळ होता. अस्वस्थ होता. गण्या झोपी गेला, पण त्याचं खिन्न, उदास, मन फारफार अस्थिर उद्विग्न होतं, भग्न नव्हतं तर, कार्यमग्न होतं.

"लोकांची जनगणना सोडून प्राण्यांची गणती करणे" याचा गण्याला आश्चर्याचा धक्काच बसला. तो वाघाकडे गेला. वाघाला विचारु लागला. वाघोबा! तुम्ही प्राणी असून तुमची गणना होते.

आम्ही ओबीसी माणसं असून आमची गणना नाही होत. पशुपक्ष्यांची, झाडाझुडपांची संख्या मोजली जाते. आम्ही ओबीसी असे दुर्लक्षित का? तुम्ही वाघ कधी मागणी पण करत नाही, आम्ही ओबीसी तर, सतत मागणी करतोये, तरी ओबीसीची जातवार जनगणना करणार नाही असं कारभारी शपथंवर लिहून देतात.

वाघोबा म्हणाले, "गणोबा,आम्ही जंगलात राहतो, आमच्या सोयीसाठी किती जंगल राखून ठेवायचे, त्या जंगलात किती झाडझुडपं ठेवायचे, गवत राखायचे, किती पाणवठे ठेवायचे आणि खास म्हणजे आम्ही ज्या सावजाची शिकार करून उदरनिर्वाह करतो त्याची तजवीज करणे या सगळ्या गोष्टींचा विचार करून नियोजन करावे लागते म्हणून सरकार आमची संख्या मोजते. तसं नाही केलं तर वाघ जंगलाच्या बाहेर येऊन माणसांवर हल्ले करणार नाही का?"

"मग काय ओबीसींनं वाघासारखे आक्रमक व्हावे, हल्ले करावे?म्हणजे आमची दखल घेतली जाईल! असं वाटतं तुम्हाला वाघोबा," गण्या म्हणाला.

"तसं नाही राखीव जंगलात माणसं वाघाना बघायला येतात, सफारी करतात, तशी सरकारी तिजोरीत भर पडते, वाघांच्या वास्तव्यामुळे वन संरक्षण होते, सजीव सृष्टीची भरभराट होत राहते. निसर्गाचे संतुलन टिकून राहते. तुमचं ओबीसीचं असं आहे का? ओबीसी म्हणजे जणू बफर झोनसारखा समजून तुम्हाला तर सारखं वापरून घेतलं जाते, धर्माच्या नावाखाली कर्मकांडात अडकून ठेवलं जातं, ते ब्रम्हाच्या तोंडातून जनले न पवित्र झाले, देवाचा अवतार, भूदेव म्हणून त्यांच्या कडून विधी करा, पाया पडा, तीर्थ प्या, दानदक्षिणा द्या, अनब भटजीचं सारं ऐका, स्वतःची अक्कलहुशारी दाखवू नका, प्रश्न विचारु नका, धर्म बुडेल, भयंकर पाप लागेल, नरकात जाल केवढी भिती घालून ठेवलीरं बाबा! मंदिराच्या आंदोलनात, जातीय दंगलीत, धार्मिक दंगलीत अनपेड पोलीस सारखं. मुस्लीम–ख्रिश्चन या धार्मिक अल्पसंख्यांकांच्या विरोधात धार्मिक द्वेष पसरवून तर आदिवासी–दलित समुदायांच्या आरक्षणाचा द्वेष ओबीसीच्या मनात भरवून ओबीसींना आपला न्यायपूर्ण अधिकाराचा वाटा कळू दिला जात नाही. ओबीसीच्या हिताचा मंडल आयोग लागू करण्यात आला, तेव्हा ओबीसी जागृत होऊन हक्काच्या आरक्षणाचा लढा मजबूत होईल म्हणून राममंदिराचा मुद्दा ऐनवेळी उकरून काढून ओबीसी आंदोलन क्षीण करुन टाकले, असे धूर्त, कावेबाज आमच्या वाघाच्या नादी लागत नाही. आमच्या बाबतीत असं कोणी वागू शकत नाही.–वाघोबा

"ओबीसी ५० टक्के च्या वर आहे. तरी एवढा दुर्लक्षित आहे. तरीसुद्धा ओबीसीचा व्यवस्थेला अजिबात धाक नाही; असा तुमचा सूर दिसतो.असं कसं म्हणू शकाल वाघोबा?"–गण्या

"तुम्ही ओबीसी एवढ्या मोठ्या संख्येने असून विखुरलेले आहात. आपल्या हक्काच्या जाणीवेचा अभाव आहे. जातीजातीत बंदिस्त असल्याने न्यायासाठी लढताना तुमचा खरा हितशत्रू तुमच्या ध्यानात येत नाही. जे तुमचे हितशत्रू आहेत त्यांच्या ब्रम्हजाळात तुम्ही अडकले गेलेले आहेत. त्यांना तुमच्या प्रत्येक धर्म विधीसाठी डोक्यावर बसवून घेत, तुमचा धार्मिक उपासनेचा अधिकार गहाण टाकलेला आहे, त्याचा ते फायदा उचलून ओबीसीला मोठ्या शिताफीने धार्मिक गुलामगिरीत ठेवत आलेले आहेत, अशी इत्थंभूत चर्चा इकडे आलेले पर्यटक करत असतात.अशा आणखी बऱ्याच बाबी ओबीसीच्या अधोगतीला कारणीभूत आहेत.

मराठा ओबीसीत भांडण, ओबीसी भटके विमुक्त यांच्यातील सवतेसुभे,फाटाफूट,चढाओढ ओबीसी जनगणना आंदोलनाची धार बोथट करण्यासाठी वापरली जाते. म्हणून वाघांची गणना होते ओबीसीची नाही. वाघोबा रंगात येऊन गण्याशी संवाद साधत होता. वाघोबा उभा राहिला इकडेतिकडे मान वळवली, न जर टाकली. गण्याकडे पाहिलं. गण्याला वाटलं आता वाघोबा आपल्याकडे कूच करणार! तो फार भेदरला. घाबरला. दरदरून घामाघूम झाला. त्यानं बळ एकवटून पळ काढण्याचा प्रयत्न केला, पण अंथरुणातच कूस पालटली. अनब खाडकन जाग आली. अवतीभवती बघितलं. क्षणात गण्या भानावर आला.

**अनुज हुलके**

# क्रुड ऑईलची चोरी करणारी टोळी गजाआड



**गोंदिया :** टँकरचे बनावट कागदपत्रे, नंबर प्लेट तयार करून तालुक्यातील अर्जुनी येथील पारिजात ऑइल मिलमधून ३२२७ किलोग्रॅम राइस बफांड क्रुड आइलची अफरातफर करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा रावणवाडी पोलिसांनी पर्दाफ्फाश केला आहे.या प्रकरणात सात आरोपींना ताब्यात घेत २६,११५ किलोग्रॅम राइस बॅड क्रुड ऑइल व टँकर असा ५० लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

फिर्यादी गुरमितसिंग मसासिंग भुफ्र (३६, रा. डिलाराम ता. जि. फिरोजपूर, पंजाब) सध्या रा. पारिजात ऑइल मिल कॅम्पाउंड, अर्जुनी यांनी १९ जानेवारी २०२४ रोजी रावणवाडी पोलिसात दिलेल्या तकरारीनुसार, २८ डिसेंबर २०२३ रोजी दुपारी तीनच्या सुमारास राहुल टँकर सर्विस रायपूर (छत्तीसगढ) मालक योगेश विमलदेव ठाकूर यांच्याद्वारा पाठविलेला टँकरचालक सुनीलकुमार बह्मानंद मिश्रासोबत आरोपींनी संगणमत केले. त्यानंतर त्यांच्या पारिजात ऑइल मिलमधून २३,७१, ८४५ रुपये किमतीचा ३२२७ क्विंटल राइस बॅड क्रुड ऑइल साल्वेन्ट प्रा. लि. कंपनी मुरैना, मध्य प्रदेश येथे न पोहोचवता अफरातफर केली. दरम्यान, गुरमितसिंग भुफ्र यांच्या तक्रारीवरून रावणवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

पोलिस निरीक्षक पुरुषोत्तम अहेरकर यांच्या मार्गदर्शनात पोलिस पथकाने तपास केला. आरोपी गुजरात येथे असल्याची माहिती मिळाली. पोलिसानी गुजरातला जाऊन आरोपींना ताब्यात घेतले. आरोपींनी टँकर क्रमांक जीजे १२ एझेड २२९५ या क्रमांकाची नंबर प्लेट बदलून त्यावर दुसऱ्या क्रमांकाची नंबर प्लेट लावली. तसेच त्या क्रमांकाचे खोटे कागदपत्रे तयार करून आरोपी चालक महेंद्रकुमार हरगोवनभाई मकवाना याचे सुनीलकुमार बह्मानंद मिश्रा नावाने खोटे ड्रायव्हिंग लायसन्स बनवून गुन्हा करण्याचा कट रचल्याचे तपासात स्पष्ट झाले. आरोपींच्या ताब्यातून ३० लाख रुपयांचा टँकर जप्त केला. त्यांना ताब्यात घेत कसून चौकशी केली असता आरोपींनी अफराफर केलेला राइस ब्रॅड क्रुड आइल आरोपी मुकेश विठ्ठलभाई चौवाटीया (४७, रा. ११५, शांतीनगर, ता. अंजार, जि. कच्छभुज, गुजरात), मधूभाई भिकाबाई चौवाटीया (६०, रा. जांझर्डा रोड, गोपालधाम सोसायटी, जुनागड, जि. जुनागड गुजरात) यांना विक्री केल्याचे सांगितले. त्यांना ताब्यात घेत २० लाख ९० हजार रुपये किमतीचा २६,११५ किलोग्रॅम राइस ब्रॅड क्रुड आइल व टँकर असा ५० लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिसांनी आरोपींची कसून चौकशी केली असता आरोपींनी विविध राज्यात अनेक गुन्हे केल्याचे उघड झाले आहे. मध्य प्रदेश, गुजरात, राजस्थान आदी राज्यांत कोट्यवधींचे मस्टर्ड आइल, राईचे आइल व राइस ब्रॅड क्रुड ऑइलची अफरातफर केली आहे.

**इतर आरोपींमध्ये यांचा समावेश**

लक्की राजसिंग घेमेंद्रसिंग जडेजा (३६, रा. वर्षामेडी ता. अंजार कच्छ, गुजरात), राजेश अशोकभाई लिंबाचिया (२८, रा. भारतनगर, गांधीधाम कच्छ, गुजरात), महेंद्रकुमार हरगोवनभाई मकवाना (४३, रा. कमालपूर, ता. राधनपूर जि. पाटन, गुजरात), कल्याण ताताराव सौरभ (२८, रा. आदीपूर कच्छ, गुजरात), संजय हजारीलाल मावर (३६, रा. कच्छ, गुजरात), अशी अन्य आरोपींची नावे आहेत.

# २० वर्षांत धानाच्या हमीभावात केवळ १६३३ रुपयांची वाढ

## खर्च वाढला हजारात, हमीभाव वाढला रुपयांत



**गेल्या वीस वर्षांतील धानाचे हमीभाव**

| वर्ष | धानाचे हमीभाव (रुपयांत) |
|---|---|
| २००३-०४ | ५५० रुपये |
| २००४-०५ | ५६० |
| २००५-०६ | ५७० |
| २००६-०७ | ५८० |
| २००७-०८ | ६४५ |
| २००८-०९ | ८५० |
| २००९-१० | ९५० |
| २०१०-११ | १००० |
| २०११-१२ | १०८० |
| २०१२-१३ | १२५० |
| २०१३-१४ | १३१० |
| २०१४-१५ | १३६० |
| २०१५-१६ | १४१० |
| २०१६-१७ | १४७० |
| २०१७-१८ | १५५० |
| २०१८-१९ | १७५० |
| २०१९-२० | १८१५ |
| २०२०-२१ | १८६८ |
| २०२१-२२ | १९४० |
| २०२२-२३ | २०४० |
| २०२३-२४ | २१८३ |
| २०२४-२५ | २३०० |

**गोंदिया:** केंद्रीय कृषी मूल्य आयोगाकडून दरवर्षी सर्वच पिकांच्या हमीभावात वाढ केली जाते. सन २०२४–२०२५ करिता धानाच्या हमीभावात ११७ रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे यंदाच्या खरीप हंगामात धानाला २३०० रुपये प्रति क्विंटल दर मिळणार आहे. गेल्या २० वर्षात धानाच्या हमीभावात केवळ १६३३ रुपयांनी वाढ झाली आहे. तर २० वर्षांत धानाच्या शेतीचा एकरी लागवड खर्च २० ते २२ हजार रुपयांवर गेला आहे. उत्पादन खर्चाच्या तुलनेत मिळणारा हमीभाव फारच कमी असल्याने धानाची शेती करायची तरी कशी असा सवाल जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून केला जात आहे.

धानाच्या शेतीचा खर्च दिवसेंदिवस वाढत चालला आहे. मशागतीचा खर्च, खते, बियाणे यांच्या वाढत्या किंमती, मजूरीचे वाढलेले दर, पेट्रोल व डिझेलच्या दरात झालेली वाढ यामुळे धानाच्या शेतीचा एकरी लागवड खर्च २० ते २२ हजार रुपयांवर पोहोचला आहे. तर एकरी धानाचे उत्पादन हे १८ ते २० क्विंटल असून त्यातून खर्च जाता तीन चार हजार रुपये वाचतात.

एवढ्या खर्चात शेतकऱ्यांनी कुटुंबासह वर्षभर केलेली मेहनत आणि वर्षभराच्या उदरनिर्वाहाचा खर्च कसा भरुन काढायाचा असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर निर्माण झाला आहे. गेल्या वर्षी धानाला २१८३ रुपये हमीभाव होता त्यात आतण ११७ रुपयांची भर पडल्याने खरीप हंगामात शेतकऱ्यांना २३०० प्रति क्विंटल दर मिळणार आहे. पण उत्पादन खर्चाच्या तुलनेत मिळणारा हमीभाव कमी असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचा सूर आहे.

### लगतच्या मध्यप्रदेश, छत्तीसगडला शक्त मग महाराष्ट्राला का नाही?

**लगतच्या मध्यप्रदेश आणि छत्तीसगड राज्यात धानाला २५००–३००० रुपये हमीभाव दिला जातो. मग या राज्यांना जमले ते महाराष्ट्राला का नाही असा सवाल शेतकऱ्यांकडून केला जात आहे. विशेष म्हणजे गेल्या तीन चार वर्षापासून तेथील सरकार धानाला २५०० रुपये प्रति क्विंटल हमीभाव देत आहे.**

# मतदानाच्या प्रतिज्ञेची इंटरनॅशनल बुक ऑफ रेकाडमध्ये नोंद



**गोंदिया :** भारत निवडणूक आयोगाच्या १६ मार्च २०२४ रोजीच्या अधिसूचनेनुसार संपुर्ण देशात लोकसभा सार्वत्रिक निवडणूक–२०२४ चा कार्यक्रम घोषित करण्यात आला होता, त्यानुसार गोंदिया जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघात १९ एप्रिल २०२४ रोजी मतदान (पहिला टप्पा) घेण्यात आले होते.

लोकसभा निवडणुकीत जिल्ह्यातील मतदारांनी "आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करु आणि मुक्त नि:पक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करु' याबाबत S>VEEP Cell District Election Officer, Gondia यांचेमार्फत ५ एप्रिल २०२४ रोजी संपुर्ण गोंदिया जिल्ह्यातील विविध ठिकाणी १२ तासात जास्तीत जास्त मतदारांनी भाग घेवून मतदानाबाबतची प्रतिज्ञा घेण्यात आली. त्यात गोंदिया जिल्ह्यातील ३ लाख ५७ हजार १८७ मतदारांनी एकाच वेळेस प्रतिज्ञा घेण्याबाबतची नोंद International Book of Records मध्ये घेण्यात आली असून International Book of Records यांचेमार्फत जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी गोंदिया यांना तसे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे.

जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी गोंदिया यांनी सदरचे यश संपादनाबद्दल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा स्वीपचे नोडल अधिकारी एम. मुरुगानंथम, शिक्षणाधिकारी तथा स्वीपचे सहायक नोडल अधिकारी महेंद्र गजभिये, पाटबंधारे विभागाच्या सहायक अभियंता तथा स्वीपच्या सहायक नोडल अधिकारी शिखा पिपलेवार व त्यांचे चमूतील सर्व सहकारी यांचे अभिनंदन केले आहे. तसेच आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक–२०२४ मध्ये देखील मतदारांना मोठ्या प्रमाणात अशा कार्यक्रमात सहभागी करुन घेण्यात येईल व मतदानाची टक्केवारी वाढविण्याचे प्रयत्न केले जातील. असे जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी गोंदिया यांनी कळविले आहे.

### बचत भवन अर्जुनी / मोर येथे नियोजन सभा

अर्जुनी मोर–आगामी शैक्षणिक सत्र २०२४–२५ च्या अनुषंगाने शाळा पूर्वतयारी नियोजन संदर्भाने ,जिल्हा परिषद व्यवस्थापन अंतर्गत कार्यरत मुख्याध्यापकांची शाळा पूर्वतयारी नियोजन सभा पंचायत समितीच्या सभापती सविताताई कोडापे यांच्या अध्यक्षतेखाली बचत भवन सभागृहात संपन्न झाली.

सदर सभेत शाळा पूर्व तयारी नियोजन संदर्भाने गटशिक्षणाधिकारी अनिल चव्हाण यांनी शालेय रंगरंगोटी, शालेय स्वच्छता, नवागतांचे स्वागत, मुख्याध्यापकांची जबाबदारी व कर्तव्य, शालेय नियोजन व मुख्याध्यापक नियोजन यांचे गुणवत्ता विकासासाठी असलेली उपयुक्तता ,संविधान कलमांचे वाचन, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश– २०१५, परसबागेची लागवड इत्यादी जवळपास ३५ विषयांवर चर्चा करून सदर विषयाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश मुख्याध्यापकांना दिले.याप्रसंगी उपसभापती होमराज पुस्तोडे यांनी शाळा पूर्व तयारी व गुणवत्ता विकास साधण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्नरत रहावे व राष्ट्र विकासाला हातभार लावावा असे आवाहन केले.

### बडोलेंनी जाणून घेतल्या आदिवासी भागातील समस्या

**अर्जुनी मोर.**–भाजपाचे जेष्ठ नेते व अर्जुनी मोर. विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार तथा माजी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री ईजी राजकुमार बडोले यांनी ता.२२ जुन रोजी अर्जुनी मोर. तालुक्यातील अतिदुर्गम आदिवासी नक्षलप्रभावीत असलेल्या गंधारी,जांभळी,उमरपायली,तुकुमनारायण, करांडली,या गावांना भेट देवुन थेट नागरीकांशी संवाद साधून सार्वजनिक व वैयक्तीक समस्या जाणून घेतल्या. यावेळी या दुर्गम भागांतील नागरीकांनी आपल्या गावांतील समस्यांचा पाढा वाचला. माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी येणा–या काळात आपल्या गावातील समस्या अगत्याने सोडविण्याचे आश्वासन दिले.

# मतदारयाद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम

**भंडारा :** ज्या राज्यातील विधानसभा निवडणूक आहेत त्या राज्यात दि. १ जुलै २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार यादीचा द्वितीय विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम राबविणेबाबत महाराष्ट्र, हरियाणा, झारखंड, जम्मू आणि काश्मीर या राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकारी यांना दि. २० जून २०२४ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या पत्रानुसार निर्देश दिले आहेत.

त्या अनुषंगाने जिल्हात दि. २५ जुन २०२४ ते २० ऑगस्ट २०२४ या कालावधीत द्वितीय संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी दिली.

सदर कार्यक्रमा अंतर्गत पूर्व पुनरिक्षण कार्यक्रमाचा भाग म्हणून दि. २५ जून २०२४ ते २४ जुलै २०२४ दरम्यान मतदान केंद्र स्तरीय अधिकारी (बी.एल.ओ.) यांचे मार्फत प्रत्येक मतदारांच्या घरोघरी मतदार यादीत नावाबाबत पडताळणी करणे, जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्राचे प्रमाणिकरण व सुसूत्रीकरण करणे, मतदार यादी / मतदार ओळखपत्रातील त्रुटी दूर करणे, आयोगाच्या मानकानुसार छायाचित्र प्राप्त करून मतदार यादीत सुधारणा करणे. तसेच अस्पष्ट/अंधुक छायाचित्र बदलून त्याऐवजी संबंधित मतदारांकडून योग्य दर्जाची छायाचित्र प्राप्त करून मतदार यादीत सुधारणा करणे, यादीभाग/सेक्शन यांची आवश्यकतेनुसार नव्याने मांडणी करून मतदान केंद्राच्या सीमांची पुनर्रचना करुन मतदान केंद्राच्या यादीस मान्यता घेणे. याबाबींचा समावेश आहे.तर पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत दिनांक २५ जुलै २०२४ रोजी प्रारूप मतदार यादीची प्रसिद्धी करणे. दिनांक २५ जुलै २०२४ ते ०९ ऑगस्ट २०२४ या कालावधीत मतदार यादी संदर्भातील दावे म्हणजेच नाव नोंदणी व हरकती स्विकारल्या जातील तसेच भारत निवडणूक आयोगाने मतदारांना ऑनलाईन पद्धतीने मतदार यादीत नावनोंदणीसाठी किंवा अन्य दुरुस्तीसाठी एन. व्ही. एस. पी., व्होटर हेल्पलाइन ॲप व वोटर पोर्टल या सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत.

# मत्स्यपालन व्यवसायातून प्रतिमा मौजे यांची स्वयंरोजगारातून समृध्दीकडे वाटचाल



**गोंदिया:** जिल्ह्यातील सडक अर्जुनी तालुक्यातील कोहळीटोला येथील प्रतिमा कैलाश मौजे या दारिद्रय रेषेखालील कुटूंबातील असून त्यांचे पती दुसऱ्यांच्या शेतामध्ये रोजंदारीने कामाला जात असल्यामुळे घरची पुर्ण जबाबदारी त्यांच्यावर होती. घरची परिस्थिती बरोबर नसल्यामुळे आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी काय करावे हे त्यांना सूचत नव्हते, परंतु हिंमत हारायची नाही आणि काहीतरी करुन दाखवायचे हे त्यांच्या मनामध्ये होते. एके दिवशी अचानक त्यांच्या पतीची प्रकृती बिघडली व सगळ्या कुटूंबाची संपुर्ण जबाबदारी त्यांच्यावर आली. मुला–मुलीचे शिक्षण सुध्दा कठीण झाले होते, त्यामुळे त्या फार चिंतेत होत्या.

एके दिवशी उमेदच्या महिला बचतगटाच्या सभेमध्ये त्यांना सामुदायिक संसाधन व्यक्ती (CRP) यांनी आरसेटी म्हणजे काय ? व तेथे होणाऱ्या विविध प्रशिक्षणाची माहिती दिली व घरच्या घरी राहून मुलांचा सांभाळ आणि स्वयंरोजगार कसे करता येईल याबद्दल सविस्तर माहिती दिली. प्रतिमा ही मत्स्य सखी असल्यामुळे त्यांना मत्स्यपालनाचे प्रशिक्षण घ्यावे असे वाटले. त्यांनी कोणताही विलंब न करता आरसेटी कार्यालयाशी संपर्क साधून मत्स्यपालन या प्रशिक्षणात आपले नाव नोंदविले आणि १० दिवशीय मत्स्यपालन प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षणा दरम्यान मासोळ्यांच्या जाती, त्यांना लागणारे खाद्य व त्यांचे प्रकार यांची माहिती मिळविली आणि विविध खेळाच्या माध्यमातून आत्मविश्वास, धोका पत्करणे धाडस, माहितीचा शोध अशा विविध गुणांना आत्मसात केले व मत्स्यपालनात मिळणाऱ्या योजना उदा. मत्स्यसंपदा अशा अनेक योजनांची माहिती मिळविली व १० दिवशीय प्रशिक्षण पूर्ण केले.

प्रतिमाने गावातील स्वयं सहायता समुहाच्या मदतीने मत्स्यपालन या व्यवसायाला सुरुवात करण्याचे ठरविले. त्यासाठी महिला बचत गटातून सुरुवातीला ५० हजार रुपये कर्ज घेतले आणि स्वत: जवळचे ३० हजार रुपये गुंतवणूक केली. हळूहळू उत्पन्न वाढू लागले, त्यामुळे जगण्याची व परिस्थितीवर मात करण्याची त्यांच्यात नवी उम्मीद निर्माण झाली. मिळणाऱ्या बचतीतून त्यांनी स्वयं सहायता समुहाच्या कर्जाची परतफेड केली व आता एकटीने २५ ते ३० हजार रुपये पर्यंत मासोळ्या विकून स्वत:चा व्यवसाय करीत आहे.

प्रतिमाने स्वत:चा रस्ता स्वत:च तयार केला आहे. त्यांनी परिस्थितीवर मात करुन यश संपादित केले असून सदर व्यवसायातून ती तिच्या कुटूंबाच्या इच्छा पुर्ण करीत असल्यामुळे ती आता खुप आनंदी आहे. त्यामुळे इतर महिलांनी सुध्दा नोकरीच्या मागे न लागता आपला स्वत:चा व्यवसाय सुरु करुन आपली आर्थिक उन्नती साधावी असे त्यांनी यावेळी सांगितले. स्वयंरोजगारासाठी प्रतिमाची मानसिकता घडविल्याबद्दल तिने ग्रामीण स्वरोजगार प्रशिक्षण संस्था (RSET) गोंदियाचे खुप खुप आभार मानले.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# शारिरीक व मानसिक आरोग्यासाठी योगसाधना आवश्यक-जिल्हाधिकारी प्रजित नायर

## आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



**गोंदिया :** योगसाधना ही भारताने संपूर्ण जगाला आणि मानवतावादाला दिलेली सर्वात मोठी देणगी आहे. मानवी जीवनात योगाचे अनन्यसाधारण महत्व आहे. मानवाने जीवनात सुदृढ, निरोगी व आनंददायी जीवन जगण्यासाठी तसेच शारिरीक व मानसिक आरोग्यासाठी नियमितपणे योगसाधना करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी केले.

२१ जून आंतराराष्ट्रीय योग दिनानिमीत्त इंदिरा गांधी स्टेडियम गोंदिया येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. नगर परिषदेचे मुख्याधिकारी सुनिल बल्लाळ व जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) गोविंद खामकर यांची यावेळी प्रमुख्याने उपस्थिती होती.

योगासन व प्राणायाम केल्याने मनुष्याचा शारिरीक, मानसिक व आध्यात्मिक विकास होत असतो. प्रत्येकाने रोज सकाळी योगाभ्यास केल्याने मस्तिष्क व मन संतुलीत राहते. योगासनामुळे शरिराची कार्यक्षमता वाढण्यास मदत होते तसेच मनुष्य निरोगी राहतो व शरीर बळकट बनते. त्यामुळे निरोगी राहण्यासाठी प्रत्येकाने निरंतर योगसाधना करीत राहावे असे सांगून जिल्हाधिकारी पुढे म्हणाले की, आजची जीवनशैली पुर्णपणे बदललेली आहे. आज प्रत्येकाला ताण-तणावाला सामोरे जावे लागते. त्यामुळे तणावमुक्त जीवन जगण्यासाठी आपण सर्वांनी जीवनशैलीमध्ये योगसाधनेचा समावेश करणे आवश्यक आहे. योगाभ्यास हा फक्त व्यायाम नसून योगामुळे शारिरीक, मानसिक आणि भावनिक आरोग्य सुदृढ राहते. नियमीत योगासने केल्याने शरीराला ऊर्जा प्राप्त होत असते. योगासनामुळे मनशांती तर मिळतेच शिवाय तणाव दूर होऊन एकाग्रता सुध्दा वाढण्यास मदत होते.

यावेळी योग प्रशिक्षक डॉ.नागेश गौतम यांनी प्रात्यक्षिकाद्वारे ताडासन, वृक्षासन, पादहस्तासन, अर्ध चक्रासन, त्रिकोणासन, जंघासन, अर्ध उष्ट्रासन, उष्ट्रासन, शषकासन, दंडासन, वक्रासन, वज्रासन, उत्तान मंडूकासन, मक्रासन, भूजंगासन, शलभासन, कंध्रासन (सेतू बंधासन), उत्तान पादासन, अर्ध हलासन, पवन मुक्तासन, शवासन आदी योगासने तसेच कपालभाती, नाडी शोधन (अनुलोम विलोम), शीतली, भ्रामरी इत्यादी प्राणायाम उपस्थितांकडून करवून घेतले व योगासनाचे महत्व पटवून दिले.

याप्रसंगी पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी जिल्हा प्रशासनाअंतर्गत सामाजिक वनीकरण विभागाद्वारे विविध प्रजातीचे नि:शुल्क वृक्ष रोपटे वितरीत करण्यात आले. कार्यक्रमस्थळी नागरिकांसाठी नि:शुल्क शुगर व ब्लड प्रेशर (बीपी) तपासणीचा स्टॉल लावण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अखिल विश्व गायत्री परिवार, आरोग्य भारती, आर्ट ऑफलिव्हींग, प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, पतंजली योग समिती, रामकृष्ण सत्संग मंडळ, श्री रामचंद्र मिशन हार्टफ्फुलनेस इन्स्टिट्यूट, योग मित्र मंडळ, पालावरची शाळा, पोलीस विभाग, नगर परिषद गोंदिया यांचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अरुण नशिने यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ. प्रशांत कटरे यांनी मानले. कार्यक्रमास विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माविमद्वारे कार्यरत बचतगटांना १२२ कोटीचे बँक कर्ज वाटप



**गोंदिया :** महिला आर्थिक विकास महामंडळ मुख्यालयाच्या मार्गदर्शनानुसार गोंदिया जिल्ह्याचा वर्ष २०२४-२५ चा क्रेडीट प्लॅन सेमिनार १८ जून २०२४ रोजी महिला आर्थिक विकास महामंडळ जिल्हा कार्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता.

यावेळी विभागीय सल्लागार माविम नागपूर विभाग राजु इंगळे ऑनलाइन पध्दतीने उपस्थित होते, तर प्रत्यक्षरित्या नाबार्डचे सहायक महाप्रबंधक अविनाश लाड, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक नरेंद्र मडावी, दिलीप पारधी व कैलाश मेश्राम खउउख बँक, जिल्हा व्यवस्थापक इजच श्री. चौधरी, जिल्हा व्यवस्थापक इजइ श्री पटले, जिल्हा उद्योग केंद्र व्यवस्थापक, व्यवस्थापक जिल्हा मध्यवर्ती बँक यांच्यासह जिल्ह्यातील स्टाफ, CMRC व्यवस्थापक, सहयोगिनीच्या उपस्थितीत क्रेडीट प्लॅन सादरीकरण करण्यात आले.

यावेळी महिला आर्थिक विकास महामंडळाने राज्यस्तरावर केलेली प्रगती व त्यामध्ये बँक सहभाग याबाबत राजु इंगळे यांनी मांडणी केली. जिल्ह्याचा क्रेडीट प्लॅन साध्य व सन २०२४-२५ च्या प्लॅन बाबत वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी संजय संगेकर यांनी मांडणी केली. त्याबाबत विविध बँकांनी आपली प्रतिक्रिया देत काही सुचना दिल्या. अविनाश लाड ऊऊच्च नाबार्ड यांनी यथोचित मार्गदर्शन केले व या क्रेडिट प्लॅनला सर्व उपस्थितांनी मान्यता देवून अधिकाधिक चए लोन साध्य करण्याच्या सूचना दिल्या.

याप्रसंगी वर्ष २०२३-२४ मध्ये सर्वाधिक लिंकेज करणाऱ्या CMRC स्वावलंबन लोकसंचालीत साधन केंद्र आमगाव ८.५१ कोटी, नारीचेतना लोकसंचालीत साधन केंद्र देवरी ५.९२ कोटी (नव तेजस्विनी योजना), सहारा लोकसंचालीत साधन केंद्र सालेकसा ७.०३ कोटी, स्त्री शक्ती लोकसंचालीत साधन केंद्र करटी/बु. ६.९२ कोटी (चडठङच योजना). वर्ष २०२३-२४ मध्ये सर्वाधिक लिंकेज करणाऱ्या सहयोगिनी शोभा तावाडे- स्वावलंबन CMRC आमगाव ६४ गट २.७० कोटी, कल्पना नंदेश्वर-आधार CMRC सडक अर्जुनी ५४ गट २.३८ कोटी (नव तेजस्विनी योजना), छाया मोटघरे- सहारा CMRC सालेकसा ११० गट ४.४४ कोटी, नंदेश्वरी बिसेन- तेजप्रवाह CMRC सुकडी १२१ गट ४.२६ कोटी (MSRLM योजना). वर्ष २०२३-२४ मध्ये सर्वाधिक चए कर्ज करणारी CMRC सहारा लोकसंचालीत साधन केंद्र सालेकसा- ११२ महिला १.०१ कोटी. वर्ष २०२३-२४ मध्ये ११ लक्ष रुपयाच्या वर कर्ज करणारी उचठउ प्रयास लोकसंचालीत साधन केंद्र परसवाडा ४ गट. वर्ष २०२३-२४ मध्ये विशेष प्रोत्साहनपर पुरस्कार उत्कर्ष उचठउ गोंदिया यांनी नव तेजस्विनी, NULM, Minority या तिन्ही योजना मिळून ५२४ गट व १९.१६ कोटी कर्ज उपलब्ध करून दिल्याबद्दल तसेच उत्कृष्ट कामगिरीबद्दल गौरविण्यात आले. तसेच वर्ष २०२३-२४ मध्ये जिल्ह्याचे १२१.८३ कोटी चे साध्य मध्ये बँकांचे उत्तम सहकार्याबद्दल सत्कार करण्यात आले.

तसेच वर्ष २०२४-२५ करिता २६६७ गट १०४.१८ कोटी, ३९२ JLG ११.७६ कोटी व ५६९ चए कर्ज ८.३२९ कोटी चा लक्षांक सर्व बँक मिळून सादर करण्यात आला आहे, अशी माहिती महिला आर्थिक विकास महामंडळाचे वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी संजय संगेकर यांनी दिली.

# गावाचा विकासासाठी लोकसहभाग महत्त्वाचा-अतिरिक्त मुकाअ लोखंडे

## ✻ संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत जिल्हास्तरीय तपासणीला सुरुवात
## ✻ दर्रेकसा, सावली, देवलगांव, सिलेझरीसह डव्वा ग्रामपंचायतींची केली तपासणी

**गोंदिया:-** आपले गाव स्वच्छ व सुंदर असावे असे प्रत्येकाला वाटत तरी त्याची सुरुवात ही दुसऱ्याने करावी, अशी अपेक्षा बहुतांश नागरिकांची असते. मात्र ज्यांनी गावाच्या विकासासाठी पुढाकार घेतला त्याला सर्वांनी सहकार्य करणे गरजेचे आहे. गावं विकासासाठी लोकसहभाग अत्यंत महत्वाचा आहे, असे प्रतिपादन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. तानाजी लोखंडे यांनी केले.



संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्रामस्पर्धा अन्वये जिल्हास्तरीय तपासणीच्या अनुषंगाने सालेकसा तालुक्यातील ग्रामपंचायत दर्रेकसा, देवरी तालुक्यातील सावली, अर्जुनी मोरगाव तालुक्यातील देवलगांव, सिलेझरी तसेच सडक अर्जुनी तालुक्यातील डव्वा या ग्राम पंचायतींची जिल्हास्तरीय तपासणी समितीच्या वतीने दिनांक १९ जून रोजी तपासणी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित गावकऱ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

यावेळी जिल्हास्तरीय तपासणी समिती अध्यक्ष म्हणून अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. तानाजी लोखंडे, समिती सदस्य सचिव म्हणून उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता आनंदराव पिंगळे, समिती सदस्य प्रभारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी महिला व बालकल्याण नरेश सोनटक्के, आरोग्य विभागाचे जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. निरंजन अग्रवाल, स्वच्छ भारत मिशन जिल्हा कक्षाचे शालेय स्वच्छता व आरोग्य सल्लागार भागचंद्र रहांगडाले, शिक्षणाधिकारी यांचे प्रतिनिधी गटशिक्षणाधिकारी सालेकसा डोंगरे, गटशिक्षणाधिकारी अर्जुनी मोरगाव चव्हाण, कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे प्रतिनिधी अंकीत अग्रवाल, यांचेसह देवरीचे गटविकास अधिकारी गिरिधर सिंगणजुडे, अर्जुनी मोरगाव चे गटविकास अधिकारी वैद्य, सडक अर्जुनी चे गटविकास अधिकारी सानप, सालेकसा विस्तार अधिकारी पराते, गावड, देवरी विस्तार अधिकारी झामरे, अर्जुनी मोरगाव विस्तार अधिकारी राणे, मोरेश्वर धोंगडे, सडक अर्जुनी विस्तार अधिकारी पटले, यांचेसह इठउ महेश वाढई, भीमराज पारधी, सुरेश पटले, राधेश्याम राऊत, वॉश अभियंता बिसेन उपस्थित होते.

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान सन २०२३-२४ अंतर्गत ५३ जिल्हापरिषद गटातून प्रथम आलेल्या ५३ ग्रामपंचायतीमधून गुनानुक्रमे ९ ग्रामपंचायतींची तपासणी जिल्हास्तरीय समितीच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. यात सालेकसा तालुक्यातील दर्रेकसा, देवरी तालुक्यातील सावली, अर्जुनी मोरगाव तालुक्यातील देवलगांव, सिलेझरी, सडक अर्जुनी तालुक्यातील डव्वा, गोरेगांव तालुक्यातील तुमखेडा बु., आम गाव तालुक्यातील शिवनी, गोंदिया तालुक्यातील गंगाझरी तसेच तिरोडा तालुक्यातील नहरटोला या ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

तपासणी दरम्यान पाणी गुणवत्ता व पाणी व्यवस्थापन, शौचालय व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन, गाव परिसर स्वच्छता आदी घटकांची तपासणी करण्यात आली.

शाळा व आंगणवाडी मधील शौचालय स्थिती, पिण्याच्या पाण्याची सोय, परिसर स्वच्छता या घटकांच्या अनुषंगाने तपासणी करून मूल्यांकन करण्यात आले.

### ग्रामसेवक नागपूरेला मारहाण

गोंदिया- तालुक्यातील रावणवाडी पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या मुरपार येथील ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक नरेंद्र नागपूरे यांना मारहाण करण्यात आल्याची घटना २४ जून रोजी घडली.तक्रारदार नागपूरे यांच्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला असून शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचा ठपका ठेवला आहे.

# शिक्षकांनी विद्यार्थ्याच्या गुणवत्तेवर भर द्यावा-आ. विजय रहांगडाले

**`तिरोडा:-** जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत पंचायत समिती शिक्षण विभाग तिरोडा तर्फ्रे शाम मंगलम लान तिरोडा येथे शाळापूर्व तयारी सविचार सभा आयोजित करण्यात आली होती.



या कार्यक्रमाचे अध्यक्ष तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले हे होते. यावेळी जि.प.शाळेच्या शिक्षणावर भर देत होतकरु व गरीब विद्यार्थ्याची गुणवत्ता हि शिक्षकावर अवलंबून असते तेव्हा शिक्षकानी यावर भर द्यावे तसेच मोठमोठे अधिकारी हे जि.प.शाळेतून शिक्षण घेऊन झाल्याचे निर्दशनास आले आहे. जि.प.शाळेतील शिक्षक हे अनुभवी असून विविध प्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्याच्या अध्ययणावर भर देण्यात येते त्यामाध्यातून वातावरन निर्मिती होत असते राष्ट्रनिर्माण करण्याकरिता शिक्षकाची महत्वाची भूमिका आहे,आजही समाजात शिक्षकाचे महत्वाचे स्थान आहे असे प्रतीपादन तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले यांनी केले. यावेळी प्रामुख्याने प.स.सभापती कुंता पटले, उपसभापती हुपराज जमाईवार, प.स.सदस्य डॉ.चेतलाल भगत, गटविकास अधिकारी विनोद चौधरी, संचालक मुकेश अग्रवाल व सर्व केंद्राचे केंद्र प्रमुख, शिक्षक,शिक्षिका उपस्थित होते यावेळी जि.प.शाळेतून प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्याचा आमदार महोदयांच्या हस्ते सत्कारसुद्धा करण्यात आला.

## ओबीसी विद्यार्थ्यांसाठी मोफत स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण

**पुणे :** महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपूर या स्वायत्त संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या सन २०२४-२५ या वर्षातील स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणासाठी अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून विद्यार्थ्यांनी www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने ३ जूलैपर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले यांनी केले आहे.महाज्योतीमार्फत केंद्रीय नागरी सेवा परीक्षा, राज्यसेवा परीक्षा, अभियांत्रिकी सेवा परीक्षा, स्टाफ्फ सिलेक्शन कमिशन परीक्षा, बँकिंग, एलआयसी व रेल्वे परीक्षा आदी परीक्षांसाठी नामांकित प्रशिक्षण संस्थेत मोफत पूर्व प्रशिक्षण राबविले जाते. प्रशिक्षणाबाबतचे सर्व तपशील, निकष, अटी व शर्ती तसेच अर्ज करण्याची सविस्तर प्रक्रिया याबाबतची माहिती www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.महाज्योतीमार्फत प्रशिक्षणात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येक महिन्यात विद्यावेतन तसेच प्रशिक्षणासाठी रुजू होताना एकरकमी आकस्मिक निधीदेखील देण्यात येणार आहे. प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांची निवड प्रवेश परीक्षेद्वारे होणार आहे.

राज्यातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील इच्छुक विद्यार्थ्यांनी विहित कालावधीत अर्ज करावा. तसेच अधिक माहितीसाठी ०७१२-२८७०१२०/१२१ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन महाज्योतीचे प्रकल्प व्यवस्थापक विकास गडपायले यांनी केले आहे.

## क्रीडा संकुलात सुविधा निर्माण करण्यावर भर द्यावा-जिल्हाधिकारी प्रजित नायर

**गोंदिया :** जिल्हा क्रीडा संकुलात येणारे खेळाडू व नागरिकांना पुरेशा प्रमाणात क्रीडा सुविधा असणे आवश्यक असून त्या निर्माण करण्यावर भर देण्यात यावा अशा सूचना जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा क्रीडा संकुल समिती गोंदिया प्रजित नायर यांनी केल्या.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हा क्रीडा संकुल समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम नरेश लभाने, उपमुख्य कार्यकारी अधिकारी गोविंद खामकर, जिल्हा माहिती अधिकारी रवी गिते, नगर परिषद मुख्याधिकारी सुनील बल्लाळ व जिल्हा क्रीडा अधिकारी नंदा खुरपुडे यावेळी उपस्थित होते.


## ग्राम पंचायत कार्यालय मुंडीपार/ई.
### पंचायत समिती सडक/अर्जुनी जि.गोंदिया
### -: टेंडर नोटीस :-

जा.क्र.ग्रा.पं.मुंडीपार/ई.नी.१४८/ /२०२४-२५ दि.२४/७/२०२४-२५ ग्रा.पं.मुंडीपार/ई.त.स./अर्जुनी जि.गोंदिया च्या वतीने खालील नमुद केलेल्या कामाकरिता ऑनलाईन जाहिरात पद्धतीने महाराष्ट्र शासन/ जि.प.गोंदिया/सार्वजनिक बांधकाम विभागाच्या योग्य त्या वर्गातील पंजीबद्ध कंत्राटदाराकडून दोन लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे. या निविदेबाबत संपुर्ण माहिती ग्रामपंचायत मुंडीपार/ई. येथे दि.२६/०६/ २०२४ रोजी ११.०० वाजेपासून दिनांक ३०/०६/२०२४ ला दुपारी ३.०० वाजेपर्यंत पाहता येईल व निविदा मिळतील यांनी भेटता येईल.

| कामाचे नाव | कामाची किंमत | निविदा फी | अनामत रक्कम | निधी प्रमुख | कामाचे कालावधी | कंत्राटदाराचे वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १.बंधीस्त नाली बांधकाम. | २,२६,४५९/- | २००/- | २,३००/- | १५ वा वित्त आयोग | ९० दिवस | १ ते ७ |
| २.गावांतर्गत रस्ता, सार्वजनिक जागा येथे पेव्हर ब्लॉक बसविणे. | ६१,०९६/- | १००/- | ६५०/- | १५ वा वित्त आयोग | ९० दिवस | १ ते ७ |
| ३.जि.प.शाळेसमोरील हनुमान मंदिर परिसरात पेव्हर ब्लॉक बसविणे. | १,७०,०००/- | २००/- | १७००/- | १५ वा वित्त आयोग | ९० दिवस | १ ते ७ |
| ४.रस्त्याच्या बाजुला नाली खोदून सांडपाणी व्यवस्थापन करणे. | ३०,०००/- | १००/- | ३००/- | १५ वा वित्त आयोग | ९० दिवस | १ ते ७ |

**निविदा बाबद आवश्यक बाबी :-**

१. निविदा विक्री व स्विकृती २६/०६/२०२४ रोजी दुपारी ११.०० वाजेपासून दिनांक ३०/०६/२०२४ ला दुपारी ३.०० वाजता पर्यंत

२.निविदा उघडणे ०१/०७/२०२४ दुपारी ३.०० वाजता (शक्य झाल्यास)

३. निविदा फी हि निविदा खरेदी करतांना नमुना ७ च्या पावती द्वारे भरण्यात यावी.

४. सुरक्षा अनामत रक्कम हि निविदा उघडल्यानंतर ५ दिवसाच्या आत नमुना ७ च्या पावती द्वारे ग्रा.पं.कार्यालय मुंडीपार/ई. येथे जमा करुन पावती क्र.नोंदणी करुन पावतीची प्रत कार्यालयात जमा करावी.


५. कोणतीही निविदा अंशत: अथवा पुर्णता स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार सरपंच व ग्रामसेवक ग्रा.पं.मुंडीपार/ई. यांनी राखून ठेवण्यात आलेली आहे.

**सरपंच** ग्रा.पं.मुंडीपार/ई. — **सचिव** ग्रा.पं.मुंडीपार/ई.



सत्यमेव जयते महाराष्ट्र शासन

# थोर कल्याणकारी लोकराजाला जयंतीनिमित्त मानाचा मुजरा!



२६ जून राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती



नरेंद्र मोदी प्रधानमंत्री | देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री | अजित पवार उपमुख्यमंत्री | एकनाथ शिंदे मुख्यमंत्री

www.mahasamvad.in | /MahaDGIPR | /MaharashtraDGIPR | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय - महाराष्ट्र शासन

# लोकसभेनंतर आता विधानसभेसाठी दोन मतदारसंघात होणार रस्सीखेच

## अर्जुनी मोरगाव, तिरोड्याच्या जागेवरुन निर्माण होऊ शकतो पेच, सर्वांचे दावे



**गोंदिया:** लोकसभेची निवडणूक संपली असून आता चार महिन्यांनी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी विद्यमान आमदारांसह इच्छुकांनी तयारी सुरु केली आहे. आतापासूनच सर्वच राजकीय पक्षांनी तयारी सुरु केली आहे. तर गोंदिया जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघापैकी अर्जुनी मोरगाव आणि तिरोड्याच्या जागेवरुन महायुतीत भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजीत पवार गट व महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात जोरदार रस्सीखेच होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या मतदारसंघातील घडामोडींकडे संपूर्ण जिल्हावासीयांचे लक्ष लागले आहे.

विधानसभा निवडणुकीची वेळ जसजशी जवळ येत आहे. तसतसा राजकीय पक्षांकडून मतदारसंघावर दावा केला जात आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडीचे समीकरण नव्हते. त्यामुळे जागा वाटप करताना फारशी अडचण गेली नाही; मात्र आता चित्र वेगळे आहे. त्यातच भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघात काँग्रेस उमेदवाराच्या विजयाने बरीच समीकरणे बदलण्याची शक्यता आहे. अर्जुनी मोरगाव मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेस अजीत पवार गटाचे आ.मनोहर चंद्रीकापुरे हे आहेत. तर गेल्या दोन निवडणुकांपासून हा मतदारसंघ याच पक्षाकडे आहे. तर भाजपाचा सुद्धा हा परंपरागत मतदारसंघ राहिला आहे.

माजी आ.राजकुमार बडोले हे या मतदारसंघातून तयारी करीत आहेत. तर आता महायुतीमुळे भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजीत पवार गट एकत्र आहेत. त्यामुळे या जागेवर दोघांकडूनही दावा केला जात आहे. इच्छुकांची संख्या सुद्धा बरीच आहे. त्यामुळे ही जागा आपल्याकडेच राहावी यासाठी जोरदार रस्सीखेच होण्याची शक्यताआहे. तर हीच स्थिती महाविकास आघाडीत असून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून या जागेवर दावा केला जात आहे. त्यामुळे महायुतीसारखीच स्थिती येथे महाविकास आघाडीची होण्याची शक्यता आहे.

तर तिरोडा विधानसभा मतदारसंघात सुद्धा हीच स्थिती निर्माण होऊ शकते. हा मतदारसंघ भाजपाचा परंपरागत मतदारसंघ राहिला आहे. गेल्या दशकभरापासून भाजपाचे आ.विजय रहांगडाले हे या मतदारसंघाचे नेतृत्व करीत आहेत. तर राष्ट्रवादी काँग्रेस अजीत पवार गट या मतदारसंघातून उमेदवार देत आला आहे. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत काय चित्र राहते हे महत्वपूर्ण ठरणार आहे. तर महाविकास आघाडीत सुद्धा हीच स्थिती आहे. त्यामुळे या मतदारसंघातील घडामोडींकडे संपूर्ण जिल्हावासीयांचे लक्ष लागले आहे.

### वरिष्ठ नेत्यांचा लागणार कस

**अर्जुनी मोरगाव आणि तिरोडा मतदारसंघ आपल्याकडे राहावा यासाठी महायुती आणि महाविकास आघाडीतील घटक पक्षांचा प्रयत्न असणार आहे. तर मतदारसंघातील जागेचा तिडा सोडविण्यासाठी वरिष्ठ नेत्यांचा कस लागणार आहे. यावर तोडगा न निघाल्यास निवडणुकी दरम्यान वेगळे चित्र पाहायला मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

### गोंदिया विधानसभा मतदारसंघात वाढणार चुरस

**सध्या या मतदासंघाचे नेतृत्व अपक्ष आ.विनोद अग्रवाल हे करीत आहेत. ते पुन्हा निवडणूक रिंगणात राहणार यात शंका नाही. तर दुसरीकडे भाजपाचे माजी आ.गोपालदास अग्रवाल यांनी सुद्धा मतदारसंघातून मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजीत पवार गटाकडून सुद्धा या जागेवर दावा केला जात आहे. तर शिंदे सेनेचे जिल्हाप्रमुख मुकेश शिवहरे यांनी सुद्धा तयारी सुरु केली आहे. तर महाविकास आघाडीकडून काँग्रेस आणि उद्धवसेनाकडून दावेदारी केली जात आहे. त्यामुळे या मतदारसंघात यावेळेस चांगलीच चुरस पाहायला मिळणार आहे.**

# त्या पदाधिकाऱ्यांच ठरलं, जुलैच्या पहिल्या आठवड्यात काँग्रेस प्रवेश

## दिग्गजांच्या प्रवेशावर चुप्पी, सर्वाधिक फटका कुणाला बसणार

**गोंदिया:** लोकसभा निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडीचे समीकरण यात सहभागी घटक पक्षांच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या पचनी पडले नाही. त्यामुळे त्यांनी आपली वाट वेगळी करण्याचा निर्णय घेतला आहे. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला मिळालेल्या यशानंतर भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील नाराज पदाधिकाऱ्यांनी आता काँग्रेसची वाट धरण्याचे निश्चित केले आहे. या पदाधिकाऱ्यांचा जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात गोंदिया येथे आयोजित एका कार्यक्रमात प्रवेश होणार असल्याची माहिती आहे.

भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघात महायुतीच्या उमेदवाराचा पराभव झाल्यानंतर कोणी प्रामाणिकपणे काम केले याचा लेखाजोखा बुथनिहाय मतदानावरुन काढला जात आहे. ज्या गावात भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस अजीत पवार गटाचे नेते, पदाधिकारी आहेत त्यांच्या गावात महायुतीच्या उमेदवाराला किती मते मिळाली तर महाविकास आघाडीच्या विजयी उमेदवाराला किती मते मिळाली याचा लेखाजोखा घेतला जात आहे. महायुतीत सहभागी घटक पक्षाच्या काही पदाधिकाऱ्यांनी त्यांना हे समीकरण न पचल्याने त्यांनी उघडपणे महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा प्रचार केला होता. शिवाय निवडणुकीच्या दिवशी बूथ बाहेर बसून एका घटक पक्षाच्या पदाधिकाऱ्याने महाविकास आघाडीच्या उमेदवाराला मतदार करा असे सांगत होता. या सर्व बाबी आता लपून राहिलेल्या नाही. पराभवानंतर यासर्व गोष्टींची बेरीज व वजाबाकी केली जात आहे.



विशेष म्हणजे अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघात भाजपाला मित्र पक्षांची साथ मिळाली नसल्याचे २० मतांचा खड्डा पडल्यानंतर स्पष्ट झाले आहे. तर घटक पक्षाचे पदाधिकारी असलेल्या गावात महायुतीच्या उमेदवाराला कुठे २०० तर कुठे ४५० मतांचा खड्डा पडला आहे. त्यामुळे यावरुन नाराजीचा सूर आवळला जात आहे. तर या तालुक्यातील आठ पदाधिकाऱ्यांनी आता काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती आहे. त्यांच्या प्रवेशाचा मुहूर्त आता ठरला असून जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात हा पक्ष प्रवेश होणार असल्याची माहिती आहे.

### त्या नेत्यांच्या प्रवेशावर मात्र चुप्पी

**महायुती आणि महाविकास आघाडीच्या समीकरणामुळे विधानसभा निवडणुकीच्या उमेदवारीसाठी इच्छुक असणाऱ्या अनेकांचा हिरमोड होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या नेत्यांनी सध्या दोन्ही तबल्यावर हात ठेवले आहे. विधानसभेत निवडणुकीत तिकीट मिळण्याची शक्यता कमी असल्याचे लक्षात येताच वेळीच हात पकडण्याची तयारी दोन दिग्गज नेत्यांनी केली आहे. त्यामुळे या दोन नेत्यांच्या प्रवेशावर सध्या चुप्पी साधली जात आहे.**

### तो नेता किती विश्वासार्ह

**जिल्ह्यातील एका सध्या आहे त्या पक्षातून काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याच्या तयारीत आहे. या नेत्याने यापुर्वी तीन चार पक्ष बदलले आहे. लोकसभा निवडणुकीत सकाळी महायुतीसोबत आणि रात्री महाविकास आघाडीसोबत अशी भूमिका त्या नेत्याने घेतली होती. त्यामुळे तो नेता किती विश्वासार्ह याची चर्चा सध्या जिल्ह्यातील राजकीय वर्तूळात चांगलीच रंगली आहे.**

**जिल्ह्यातील काही नेते व पदाधिकारी काँग्रेस पक्षात येण्यास इच्छुक आहेत. यासंदर्भात ते प्रदेशाध्यक्षांच्या संपर्कात आहे. त्यांचा काँग्रेस प्रवेश निश्चित आहे. पण प्रवेशाचा दिवस अद्याप निश्चित झालेला नाही.**
**दिलीप बन्सोड, जिल्हाध्यक्ष काँग्रेस**

# शेतकऱ्यांना विश्वासात न घेताच समृद्धी महामार्गासाठी भूसंपादनाची प्रक्रिया

## धादरी येथील शेतकऱ्यांमध्ये रोष, विश्वासात घेऊन प्रक्रिया राबविण्याची केली मागणी



**तिरोडा:** नागपूर-गोंदिया समृद्धी महामार्गाच्या कामाला सुरुवात झाली आहे. यासाठी शेतकऱ्यांची जमीन संपादित करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. पण ही प्रक्रिया राबविताना शेतकऱ्यांना विश्वासात न घेता व त्यांना याची कुठलीही माहिती दिली जात नसल्याचा आरोप तालुक्यातील धादरी येथील शेतकऱ्यांनी केला आहे. ही प्रक्रिया शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन राबविण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी शुक्रवारी (दि.२१) उपविभागीय अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

धादरी-उमरी येथील शेतकऱ्यांनी शुक्रवारी डॉ.दीनदयाल पटले यांच्या नेतृत्वात तिरोड्याचे उपविभागीय अधिकारी यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी शेतकऱ्यांनी नागपूर-गोंदिया समृद्धी महामार्गासाठी जमीन संपादित करण्यात येणाऱ्या धादरी येथील शेतकऱ्यांची यादी १९ जूनला स्थानिक ग्रामपंचायतीला प्राप्त झाली. या यादीवर कोणत्याही शेतकऱ्याचा आक्षेप असल्यास २१ दिवसांच्या आत नोंदविण्यास सांगितले आहे.

विशेष म्हणजे ज्या शेतकऱ्यांची जमीन या महमार्गासाठी जाणार आहे, त्यांची कसलीही माहिती शेतकऱ्यांना नव्हती. या महामार्गात धादरी-उमरी येथील अनेक शेतकऱ्यांची जमीन जाणार असल्याने त्यांच्यावर भूमिहिन होण्याची वेळ आली आहे. तसेच तिरोडा तालुक्यातील अनेक गावातील शेतकऱ्यांची जमीन नागपूर-गोंदिया समृद्धी महामार्गात जाणार आहे. महामार्गासाठी जमीन संपादित करताना शेतकऱ्यांना त्यासंबंधी वैयक्तिक नोटीस अथवा कुठलीह सुचना केलेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. शसनाने जमीन संपादित करण्याची प्रक्रिया ही शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच राबवावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

### शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण न झाल्यास आंदोलन

**नागपूर-गोंदिया समृद्धी महामार्गासाठी जमीन संपादित करताना शेतकऱ्यांना विश्वासात घेण्यात यावे, यासह इतर मागण्या पूर्ण करण्यात याव्यात. अन्यथा त्याविरोधात आंदोलन छेडण्याचा इशारा डॉ.दीनदयाल पटले, सुखदास अनकर, भाऊलाल पटले, कुमुद पटले, मोरेश्वर अनकर, गौरव झरारिया, शरद भौतिक, अनिल अनकर, सुनील पटले, सतीश पटले व शेतकऱ्यांनी दिला आहे.**

### या आहेत प्रमुख मागण्या

- **प्रत्येक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्याला प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देण्यात यावे.**
- **प्रत्येक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबातील एका सदस्याचा शिक्षण योग्यतेनुसार शासकीय नोकरीत समावेश करा.**
- **नागपूर ते गोंदिया प्रवेश नियंत्रीत समृद्धी महामार्गालगत शेतकरी व गावकऱ्यांच्या उपयोगाकरिता दुतर्फा सर्व्हिस रोड देण्यात यावा.**
- **शेतजमीन अधिग्रहित करताना सर्व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन सध्याच्या नवीन खरेदी किमतीच्या पाचपट रक्कम देण्यात यावी.**
- **महामार्गामुळे भूमिहिन होत असलेल्या शेतकऱ्यांना शेती करण्याकरिता शेतीयोग्य शासकीय जमीन उपलब्ध करून द्यावी.**

# उच्च शिक्षणासाठी शासकीय वसतीगृह प्रवेशाकरीता अर्ज आमंत्रित

**गोंदिया :** इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुला-मुलींकरीता जिल्हा स्तरावर १०० विद्यार्थी/विद्यार्थीनी क्षमतेचे शासकीय वसतिगृह सुरु करण्याबाबत शासनाने मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार गोंदिया जिल्ह्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ करीता शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेशाकरीता ऑफलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. करीता गोंदिया जिल्ह्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणा?्या विद्यार्थ्यांनी संबंधित वसतिगृहांचे गृहपाल यांचेशी संपर्क साधुन वसतिगृहात प्रवेश मिळण्याकरीता आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावे. सन २०२४-२५ करीता अर्ज घेण्याची शेवटची तारीख १२ जुलै २०२४ पर्यंत अर्ज स्विकारले जातील, याची विद्यार्थी व पालकांनी नोंद घ्यावी.

अर्ज वितरण व स्विकृतीकरीता विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, आर.टी.ओ. ऑफिसचे मागे, गोंदिया (मो. ८२७५२९९३२०) आणि विद्यार्थिनींनी मागासवर्गीय तथा आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, आर.टी.ओ. ऑफिसचे मागे, गोंदिया (मो. ८४५९९०८५३०) या वसतिगृहामध्ये संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी विद्यार्थी/विद्यार्थिनी व पालकांनी सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालयाचे मागे, पतंगा मैदान, गोंदिया येथे संपर्क साधावा. असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक विनोद मोहतुरे यांनी केले आहे.

# गोंदिया विधानसभेत अद्यापही चलबिचल

**गोंदिया:** स्थानिक विधानसभा मतदारसंघात गतवेळी पूर्वाश्रमीचे भाजपवासी असलेले विनोद अग्रवाल यांना पक्षाने तिकीट नाकारल्यने अपक्ष निवडणूक लढवित विजय मिळविला. १,०२,९९६ मते घेऊन ते आमदार झाले. त्यांनी भाजपचे गोपालदास अग्रवाल यांचा पराभव केला होता. निवडणूक जिंकताच विनोद अग्रवाल यांनी भाजपला पाठिंबा दिला होता. भाजपच्या गोपालदास अग्रवाल यांना फक्त ७५,८२७ मते मिळाली. निवडणूक आल्यानंतर दुसऱ्याच दिवशी विनोद अग्रवाल यांनी देवेंद्र फडणवीस आणि नितीन गडकरी यांची भेट घेऊन पाठिंबा दर्शविला होता. ते जरी अपक्ष असले तरी अद्यापही त्यांचा भाजपशी आणि भाजप वरिष्ठांचे त्यांच्यावरील प्रेम तसूभरही कमी झालेले नाही.

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी त्यांनी कंबर कसली आहे. भाजपमधून तिकीट न मिळाल्यास अपक्ष निवडणूक लढण्याची त्यांची तयारी आहे. त्यासाठी त्यांनी आपली संघटनाही स्थापन केली. जिल्हा परिषदेत त्यांचे सदस्य आहेत. पंचायत समिती सभापती त्यांच्याच संघटनेचा आहे. त्यामुळे त्यांची ताकद सध्यातरी मोठी आहे. मात्र यावेळी काँग्रेसची हवा असल्यामुळे त्यांना गतवेळीसारखे मताधिक्य घेता येणार नसल्याची स्थिती आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत या विधानसभा मतदारसंघातून जिल्ह्यातून सर्वाधिक १,१०,८११ मते त्यांनी भाजप उमेदवाराला मिळवून दिली. त्यामुळे त्यांची प्रतिमा भाजपमध्ये निखळून निघाली. मतदारसंघात विनोद अग्रवाल यांनी अपक्ष आमदार असतानाही कोट्यावधीचा निधी आणला. त्यामुळे मतदारांच्या ते पसंतीचे आहेत. असे असले तरी काँग्रेसचे यावेळी पूर्ण ताकदीनिशी विधानसभा निवडणुकीत उतरण्याची तयारी केली.




महाविकास आघाडी आणि महायुतीतील घटकपक्षांनाही या जागेवर दावा केला आहे. मात्र युती कायम राहिल्यास विनोद अग्रवाल यांनाच तिकीट मिळण्याची शक्यता अधिक आहे. तर महाआाडीकडून ही जागा काँग्रेसला जाणार आहे. महाआघाडीत फुट पडल्यास शिवसेनाही (उबाठा) ही जागा लढण्याची शक्यता आहे.

### विधानसभा क्षेत्रात्रील प्रश्न

- **शेतकऱ्यांच्या हिताचा डांगोर्ली बॅरेज**
- **गोंदिया शहरातील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प**
- **शहरातील उड्डाणपूल हे प्रश्न महत्वाचे ठरणार आहे.**

### महाआघाडीत जोरदार फाइट

**महाआघाडीतील काँग्रेसकडून अशोक गप्पु गुप्ता, अमर वऱ्हाडे, पप्पू पटले, राजीव ठकरेले तर शिवसेनेकडून जिल्हाध्यक्ष पंकज यादव आणि ऐनवेळी काँग्रेसने संधी दिल्यास भाजपचे जिल्हा परिषद सदस्य रूपेश (सोनू) कुथे हे देखील निवडणुकीत उतरण्याची शक्यता आहे.**

### महायुतीकडून इच्छुक

**गतवेळी दुसऱ्या क्रमांकावर राहिलेले माजी आमदार गोपालदास अग्रवाल विधानसभा निवडणूक लढण्याच इच्छूक आहेत. तशी फिल्डिंगही त्यांनी गत पाच वर्षापासून लावून ठेवली आहे. महायुती संपुष्टात आल्यास राष्ट्रवादी काँग्रेस माजी आमदार राजेंद्र जैन किंवा केतन तुरकर यांना संधी देऊ शकते. तर शिवसेना (शिंदे गट) मुकेश शिवहरे यांच्या नावाचा विचार करणार आहे.**

# साडेचार वर्षात जिल्ह्याला पाच पालकमंत्री, आता सहावा कोण?

## सर्व पालकमंत्री बाहेरचेच, आदिती तटकरेंच्या नावाची चर्चा

**गोंदिया:** गेल्या साडेचार वर्षाच्या कालावधीत जिल्ह्याला पाच पालकमंत्री मिळाले आहेत. तर विद्यमान पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी जिल्ह्याचे पालकमंत्रीपद सोडल्याने आता नवीन पालकमंत्री कोण याची चर्चा आहे. गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजीत पवार गट) कोट्यात असल्याने राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांच्याकडे जिल्ह्याचे पालकमंत्रीपद सोपविले जाणार असल्याचीच राष्ट्रवादी काँग्रेसच्या गोटात चर्चा आहे.

### गोंदियाचे पालकमंत्रीपद नको रे बाबा

**गेल्या साडेचार वर्षात गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्रीपद नेहमीच चर्चेत राहिले. त्यातच राज्यातील शेवटच्या टोकावरील जिल्हा असल्याने गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्रीपद स्विकारण्यास मंत्रीदेखील इच्छुक नसल्याचे बोलल्या जाते. अनेक मंत्र्यांनी गोंदियाचे पालकमंत्रीपद नको रे बााबा अशीच भूमिका घेतल्याची चर्चा आहे.**



राज्यात सन २०१९ मध्ये महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे अनिल देशमुख यांच्याकडे गोंदियाचे पालकमंत्रीपद आले. पण त्यांच्यावर कारवाई झाल्याने त्यांना हे पद सोडावे लागले. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे नवाब मलिक यांच्याकडे जवाबदारी सोपविण्यात आली. मात्र त्यांच्यावर ईडीने कारवाई केल्याने त्यांनाही हे पद सोडावे लागले. तर राष्ट्रवादीचेच प्राजक्त तनपुरे यांच्याकडे पालकमंत्रीपदाची जवाबदारी सोपविण्यात आली.

दरम्यान, राज्यात सत्ताबदल होऊन महायुतीचे सरकार सत्तेवर आले.यानंतर जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची अतिरिक्त जवाबदारी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे सोपविण्यात आली. यानंतर त्यांच्याकडील गोंदिया जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची जवाबदारी काढून राज्याचे अन्व व औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांच्याकडे जवाबदारी सोपविण्यात आली. मात्र त्यांनीसुद्धा आठ महिने जवाबदारी सांभाळल्यानंतर प्रकृतीच्या कारणामुळे जिल्ह्याचे पालकमंत्रीपद सोडले.

आतापर्यंत झालेले हे पाचही पालकमंत्री जिल्ह्याबाहेरील होते. तर आता सहावा पालकमंत्रीही जिल्ह्याबाहेरीलच होण्यची शक्यता असून यासाठी राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांच्या नावाची चर्चा आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसपुढे गड कायम राखण्याचे आव्हान

## वेध विधानसभा निवडणुकीचे, महायुतीमध्ये उमेदवारीसाठी प्रचंड चुरस

### मतदारसंघाचा मागोवा

**परिसीमन आयोगाच्या शिफारसीनंतर हा मतदारसंघ अस्तित्वात येऊन पंधरा वर्षे लोटली. हा मतदारसंघ अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव आहे. येथून दोनवेळा भाजप व एकदा राष्ट्रवादी काँग्रेसचा उमेदवार निवडून आला. त्यामुळे विशीष्ट एका पक्षाला कौल देणाा हा मतदारसंघ आहे असे म्हणता येणार नाही. या मतदारसंघात दलित, आदिवासी व कुणबी समाजाची संख्या लक्षणीय आहे. पक्ष उमेदवाराच्या विजयात बसपा व वंचित आघाडी पक्षाला मिळालेली मते निर्णायक ठरतात. अलीकडेच झालेल्या लोकसभा निवडणुकीत या मतदारसंघातून दोन्ही पक्षांचे मताधिक्य घटल्याचे दिसून आले. हे चित्र विधानसभा निवडणुकीत कायम राहील का, हे येणारा काळच ठरवेल.**

**अर्जुनी मोरगाव:** विधानसभा निवडणुकीचे वारे आता वाहू लागले आहेत. पक्षाची वज्रमुळ राखणाऱ्यांचे दौरे आगामी निवडणुकीचे संकेत देत आहेत. तशीही निवडणूक अवघ्या चार महिन्यांवर येऊन ठेपली आहे. गाव शहराच्या दर्शनी भागात बॅनर, पोस्टर्स झळकत आहेत. बॅनरवरील काही चेहऱ्यांचे तर राजकारणाशी सोयरसुतक दिसून येत नाही. काही ट्राय अगेन आहेत, तर काही हौसे गवसे प्रसिद्धीच्या प्रकाशझोतात आहेत. कुणी पक्षश्रेष्ठींना इम्प्रेस्ड करण्याचा प्रयत्न करीत आहे, तर काही ग्राऊंड लेव्हलच्या नेत्यांना सोडून हायटेक नेत्यांच्या संपर्कात आहेत.

काही स्वयंभू कार्यकर्ते स्वत:च्या नावासमोर भाऊ शब्दाचा उल्लेख करुन समाजमाध्यमावर संदेश घालण्यात धन्यता मानत आहेत. प्रत्येक राजकीय पक्षात उमेदवारीसाठी भाऊगर्दी दिसून येत आहे. काहींनी सहा महिन्यांपुर्वीपासून तयारी चालवली आहे. तर काही अनुभवी व जाणते स्पर्धक उमेदवार शांत व संयमाने तयारी करत आहेत. असे असले तरी ऐनवेळी अनपेक्षित नाव पुढे येण्याची ही जागा काँग्रेसच्या वाट्याला जाण्याची दाट शक्यता आहे. कारण महाविकास आघाडीतील दोन्ही राजकीय पक्षांचे पाहिजे तसे प्राबल्य या मतदारसंघात नाही. महाविकास आघाडीतही उमेदवारीला घेऊन प्रचंड चुरस आहे. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने या विधानसभेत २०,६५८ मतांची आघाडी घेतली होती. ही आघाडी कायम ठेवण्याचे आव्हान काँग्रेस समोर असेल. पक्षाची उमेदवारी मिळाली नाही म्हणून ऐनवेळी पक्षांतर अथवा बंडखोरी होण्याची दाट शक्यता आहे.




शक्यता नाकारता येत नाही.

महायुतीत उमेदवारीला घेऊन प्रचंड चुरस आहे. विद्यमान आमदार मनोहर चंद्रीकापुरे हे राष्ट्रवादी काँग्रेस अजीत पवार गटाचे आहेत. याच महायुतीत भाजपचे माजी आ.राजकुमार बडोले आहेत. ही जागा कोणत्या पक्षाच्या वाट्याला येते हे बघणे रंजक राहील. या दोन्ही पक्षांत आणखी बरेच इच्छुक आहेत.

महाविकास आघाडीत

### दृष्टीक्षेप

**विधानसभा २०१४**
**राजकुमार बडोले (भाजपा)-६४,४०१**
**राजेश नंदागवळी (काँग्रेस)-३४,१०६**
**विधानसभा २०१९**
**मनोहर चंद्रीकापुरे (रा.काँ)-७१,९१२**
**राजकुमार बडोले (भाजपा)-७१,१०६**
**अजय लांजेवार (वंचित)-२५,३६२**
**लोकसभा निवडणुकीत अर्जुनी विधानसभेतील मताधिक्य**
**लोकसभा २०१९**
**सुनील मेंढे (भाजपा)-८३,८४२**
**नाना पंचबुद्धे (रा.काँ)-७१,७४३**
**लोकसभा २०२४**
**डॉ.प्रशांत पडोळे (काँग्रेस)-९२,४५५**
**सुनील मेंढे (भाजपा)-७१,७९७**

# अदानी पॉवरतर्फे पर्यावरण दिनानिमित्त विविध कार्यक्रम

## वृक्षारोपणावर भर, विविध स्पर्धांमधून केली जनजागृती



**तिरोडा:** अदानी पॉवर तिरोडाच्यावतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ५ ते ११ जून दरम्यान पर्यावरण जनजागृतीपर विविध कार्यक्रम घेण्यात आले. कर्मचारी, कामगार, कुटुंबातील सदस्य आणि जवळपासच्या ग्रामस्थांमध्ये पर्यावरण संसाधनांच्या संरक्षणाबद्दल आणि पर्यावरणीय जैवविविधता राखण्याचे महत्व याबाबत जनजागृती करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात शपथ सभारंभ आणि ग्रीन रॅलीने करण्यात आली. त्यानंतर वृक्षारोपण मोहीम, पोर्टेबल मॉडेल, फोटोग्राफी, स्लोगन आणि ड्राईंग स्पर्धा व पर्यावरणीय चित्रपटांचे स्क्रीनींग, याव्यतिरिक्त स्पॉट ड्राईंग स्पर्धा, एक टॉक शो होते. विभागीय प्रश्नमंजुषा स्पर्धा, घरकाम करणाऱ्या कामगार आणि मोलकरीण यांच्यासाठी कचरा विलगीकरण आणि हाताळणी या विषयावर जागरुकता कार्यक्रम घेण्यात आला. प्रगतिशील शेतकरी आणि अदानी पॉवरच्या कर्मचाऱ्यांसाठी वाळवंटीकरण आणि दुष्काळ निवारण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

ट्रॉपिकल फॉरेस्ट रिसर्च इन्सिटट्युट जबलपूर आणि मुदा विज्ञान, कृषी महाविद्यालय नागपूरच्या वक्त्यांनी मार्गदर्शन केले. ग्रामपंचायत बेरडीपार येथेही जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. टाऊनशिप आणि प्लांटच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळण्यासाठी ज्युट पिशव्यांचे वाटप करण्यात आले.